# CONGRATULATIONS TEAM INDIA

on achieving the historic feat of winning 7 medals at the Olympics

**All of you have made the nation proud**




SERVICE




RIGHT TIME
RIGHT ACTION




TEAM WORK

SPEED







STRATEGY




STRENGTH




PLANNING

# दि संगमनेर मर्चंटस् को-ऑप. बँक लि.

नवीन नगर रोड, संगमनेर

02425- 225435, 225436, 225789

## ५६ वा वार्षिक अहवाल (२०२०-२१)

G Pay SMePAY www.smbank.in

# बँकेच्या 'डिजिटल सेवांबाबतची' माहिती देण्यासाठी
# ग्राहकमित्र

## SMePay App




- मोबाईल बँकिंगचा (SMePAY) पासवर्ड बदलण्यासाठी Birth Date (वैयक्तिक खातेधारकासाठी) व Inception Date (कॉर्पोरेट खातेधारकासाठी) गरजेची असेल. त्यामुळे बँकेशी संपर्क साधून आपल्या खात्यात वरील डेट अपडेट नसल्यास अपडेट करून घ्यावी. अन्यथा पासवर्ड विसरल्यास तो रिसेट करण्यास अडचण येईल.
- SMePAY ॲप ओपन करण्यासाठी ग्राहकांना आपल्या मोबाईलचा पॅटर्न किंवा पासवर्ड टाकावा लागेल. पासवर्ड किंवा पॅटर्न मॅच न झाल्यास SMePAY ओपन होणार नाही.
- नवीन ग्राहकांना मोबाईल बॅकींग (SMePAY) रजिस्ट्रेशन करायचे असल्यास त्यांना त्यांच्या कस्टमर आयडीला असलेला पॅन नंबर Input करणे गरजेचे आहे. त्याशिवाय नवीन रजिस्ट्रेशन होणार नाही.
- ग्राहकांच्या अधिक सुरक्षितेच्या दृष्टीने ॲपचे स्क्रीन शॉट घेण्यासाठी restrict करण्यात आलेले आहे.
- मोबाईल ॲप्स (SMePAY) चा वापर करून स्टेटमेंट डाऊनलोड केल्यास ते स्टेटमेंट पासवर्ड प्रोटेक्टेड असेल व ते ओपन करण्यासाठी पासवर्ड द्यावा लागेल. हा पासवर्ड म्हणजे त्या ग्राहकांचा कस्टमर आयडी असेल.
- View IMPS Transaction ही सुविधा IMPS व्यवहाराची receipt बघण्यासाठी उपलब्ध करून दिलेली आहे. यामध्ये सर्व IMPS व्यवहाराची माहिती मिळेल.

**ग्राहकमित्र संपर्क :** तुषार खांडरे : 90286 05259, सागर कर्डिले : 82753 91324, निशांत थोरात : 73871 90092, सौ. सुनीता पडवळ : 02425 225435 (111), सोमनाथ डेंगळे : 98228 90449
विठ्ठल कुलकर्णी : 02425 225435 (204), 98238 19138, उदय जाजू : 02425 225435 (121), 94231 66357

## आमचे प्रेरणास्थान



# स्व. श्री. ओंकारनाथजी मालपाणी

संस्थापक चेअरमन

## दि संगमनेर मर्चंटस् को-ऑप. बँक लि., संगमनेर

प्रधान कार्यालय : इंदिरा गांधी मार्ग, संगमनेर - ४२२ ६०५, जि. अ.नगर

# दि संगमनेर मर्चंटस् को-ऑप. बँक लि., संगमनेर

## विद्यमान संचालक मंडळ



राजेश ओंकारनाथ मालपाणी
चेअरमन



संतोष मोहनलाल करवा
व्हा.चेअरमन



श्रीगोपाल रामनाथ पडतानी



दिलिपकुमार माणकचंद पारख



सुनील शांताराम दिवेकर



राजेंद्र कारभारी वाकचौरे



प्रकाश सुरेश राठी



डॉ.संजय सुभाष मेहता



सतिष रामेश्वर लाहोटी



गुरूनाथ भिकन बाप्ते



ओंकार राजेंद्रप्रसाद सोमाणी



राजेश मदनलाल करवा



प्रकाश विश्वनाथ कलंत्री



संदीप श्रीनिवास जाजू



ज्ञानेश्वर बाबुराव कर्पे



डॉ.सौ.अर्चना आशुतोष माळी



सौ.ज्योती सचिन पलोड



ओंकार बद्रीनारायण बिहाणी
तज्ञ संचालक



सीए संजय शंकरलाल राठी
तज्ञ संचालक



तुकाराम पंढरीनाथ सांगळे
सेवक प्रतिनिधी



राहुल रामनाथ जगताप
सेवक प्रतिनिधी



ज्ञानेश्वर नारायण सुरम
मुख्य कार्यकारी अधिकारी
(दि.१५/०६/२०२१ पर्यंत)



गोपाळ अनिरुद्ध गांगल
मुख्य कार्यकारी अधिकारी
(दि.१२/०७/२०२१ पासून)



संजय सखाराम बागडे
उप मुख्य कार्यकारी अधिकारी



विजय दयाकिसन बजाज
असि. जनरल मॅनेजर




'प्रधानमंत्री आवास' व 'भारत पे' योजनांच्या उद्घाटनप्रसंगी सीए नारायणजी कलंत्री यांचा सत्कार करतांना चेअरमन श्री.राजेश मालपाणी



'प्रधानमंत्री आवास' व 'भारत पे' योजनांच्या उद्घाटनप्रसंगी सीए नारायणजी कलंत्री, श्री.के.के.थोरात, श्री.सुरेशजी राजपाल, डॉ.श्री.संजयजी मालपाणी



'भारत पे' योजनेच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवर ग्राहकांना क्युआर कोड (QR Code) प्रदान करतांना प्रमुख पाहुणे

# दि संगमनेर मर्चंटस् को-ऑप. बँक लि., संगमनेर



चेअरमन, व्हा.चेअरमन निवड प्रसंगी चेअरमन श्री. राजेश मालपाणी, व्हा.चेअरमन श्री.संतोष करवा व सर्व संचालक मंडळ



प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजवंदन करतांना मा.चेअरमन, व्हा.चेअरमन व सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वृंद



मुख्य शाखेतील रू.५०-५० कॅश देणारे एटीएम व नूतन एटीएमचे उद्घाटन प्रसंगी



नूतन एटीएम चे उद्घाटन प्रसंगी सर्व मान्यवर, संचालक मंडळ व कर्मचारी वृंद





बँकेचे कर्मचारी श्री.महादेव क्षत्रिय व श्री.राजेंद्र पांडुलकर यांच्या ऋणनिर्देश सोहळ्या प्रसंगी






ऋणनिर्देश सोहळ्या प्रसंगी मान्यवर कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करतांना बँकेचे चेअरमन श्री.राजेश मालपाणी





स्वामी विवेकानंद जयंती निमित्त माल्यार्पण करतांना मा.श्री.द्वारकानाथजी राठी (सर) व सर्व संचालक मंडळ

शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांचा सत्कार करतांना संचालक मंडळ व शिक्षकवृंद







# प्रगती दर्शक आलेख













'प्रधानमंत्री आवास' व 'भारत पे' योजनांच्या उद्घाटनप्रसंगी सीए नारायणजी कलंत्री, श्री.के.के.थोरात, डॉ.श्री.संजयजी मालपाणी व मान्यवर

प्रकाशक – राजेश ओंकारनाथ मालपाणी, चेअरमन – दि. संगमनेर मर्चंटस् को. ऑप. बँक लि.
इंदिरा गांधी मार्ग, संगमनेर – 422 605, जि.अ.नगर, दूरध्वनी: 02425 – 225435/ 36, Email: smbankho@smbank.in



# भावपूर्ण श्रध्दांजली...

अहवाल वर्षात आपल्या बँकेचे सभासद, ग्राहक,
ठेवीदार, हितचिंतक तसेच शास्त्रज्ञ, देशभक्त,
जवान, राजकीय, सहकार क्षेत्रातील निष्ठावंत कार्यकर्ते,
सामाजिक कार्यकर्ते, थोर समाजसेवक
जागतिक व भारतीय किर्तीचे शास्त्रज्ञ
वैज्ञानिक, थोर साहित्यिक, राजधुरंदर, शिक्षणतज्ज्ञ व हितचिंतक
तसेच अतिवृष्टी व नैसर्गिक आपत्तीमुळे,
कोव्हीड योध्दे मृत्य पावले व पंचतत्वात विलीन झाले
त्यांच्या पवित्र स्मृतीस
आम्ही आदरपूर्वक

**भावपूर्ण श्रध्दांजली**

अर्पण करीत आहोत.
त्यांच्या आत्म्यांस चिरशांती व सद्‌गती देवो
हीच ईश्वरचरणी प्रार्थना.



**– संगमनेर मर्चन्टस् बँक परिवार –**

# ऑनलाइन वार्षिक सभा

## ५६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

सन्माननीय सभासद बंधू भगिनी,

आपणास विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, दि संगमनेर मर्चंटस् को-ऑप. बँक लि., **संगमनेर या बँकेची ५६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २६-०९-२०२१ रोजी सायं. ठीक ६.०० वा. मालपाणी हेल्थ क्लब, संगमनेर** येथे कोविड १९ साथीच्या महामारी पार्श्वभूमीवर ऑनलाईन **'ऑडिओ व्हिज्युअल'' (झूमच्या) माध्यमद्वारे** बँकेचे अध्यक्ष **श्री. राजेश ओंकारनाथ मालपाणी** यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे. तरी कृपया सभासदांनी **झूम अॅप डाऊनलोड करुन घ्यावे** व खालील नमूद लिंक किंवा मिटिंग आयडी व पासवर्ड वापरुन केलेल्या सुचनेप्रमाणे सभेस 'ऑनलाईन' हजर रहावे ही नम्र विनंती.

## विषय पत्रिका

वि.क्र. १: शनिवार दि. २७ मार्च २०२१ रोजी झालेल्या ५५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

वि.क्र. २: दि. ३१ मार्च २०२१ अखेरच्या आर्थिक वर्षाचा संचालक मंडळाने तयार केलेल्या कामकाजाचा **अहवाल** वाचून त्यास मंजुरी देणे.

वि.क्र. ३: दि. ३१ मार्च २०२१ अखेरच्या **ताळेबंद व नफा तोटा पत्रकास** मंजुरी देणे.

वि.क्र. ४: सन २०२०-२१ या वर्षाच्या मा. वैधानिक लेखापरीक्षकांच्या ऑडिट रिपोर्टची वाचून नोंद घेणे.

वि.क्र. ५: सन २०१९-२० या वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षण दोष दुरुस्ती अहवालाची वाचून नोंद घेणे.

वि.क्र. ६: संचालक मंडळाने शिफारस केलेल्या दि. ३१ मार्च २०२१ अखेरच्या **नफा वाटणीस** मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.

वि.क्र. ७: सन २०२०-२१ साठी शिफारस केलेल्या **वार्षिक अंदाजपत्रकास** मंजुरी देणे.

वि.क्र. ८: मा. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या परिपत्रक दि. २७-०४-२०२१ नुसार त्यांचेकडे सादर केलेल्या प्रस्तावास अधिन राहून सन २०२१-२२ या वर्षासाठी मा. संचालक मंडळाने नियुक्त केलेल्या मा. वैधानिक लेखापरीक्षक यांच्या नेमणुकीस संमती देणे.

वि.क्र. ९: संचालक मंडळ सदस्य व त्याच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाचे विवरणपत्र वाचून नोंद घेणे.

वि.क्र. १०: मा. रिझर्व्ह बँकेच्या दि. २५/०६/२०२१ च्या परिपत्रकानुसार मा. संचालक मंडळाने मंजूर केलेल्या व त्यांच्या मंजुरीस अधिन राहून नविन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नियुक्तीस संमती देणे.

वि.क्र.११: आजच्या ५६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस ऑनलाईन उपस्थित असलेल्या सभासदांची उपस्थिती मंजूर करणे.

वि.क्र.१२: मा. अध्यक्षांच्या पूर्वपरवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मा. संचालक मंडळाचे आदेशानुसार

स्थळ : संगमनेर
दिनांक : .०५-०८-२०२१

(गोपाळ अनिरुद्ध गांगल)
मुख्य कार्यकारी अधिकारी

## वार्षिक सभेस ऑनलाइन उपस्थिती बाबत सूचना

**१) ऑनलाइन लॉगिंन बाबत सूचना**

अ) ऑनलाइन झूम मिटींग फक्त संगमनेर मर्चंट बँकेच्या सभासदांसाठीच आहे.

ब) गुगल / अॅपल प्लेस्टोर वरुन झूम अॅप डाऊनलोड करा.(झूम अॅप डाऊनलोड केलेले नसल्यास )

क) बँकेने आपल्या रजिस्टर मोबाईलवर एसएमएस/व्हॅटस् अॅप व्दारे मिटींग लिंक पाठविलेली आहे. किंवा खालील लिंकवर क्लीक करुन झूम मिटींग ऑनलाइन जाँईन करा./उपस्थित रहा.
https://us02web.zoom.us/j/82331154607?pwd=Mkw1TDg5UmNtTk9wanRyUXFIVjF4Zz09
Meeting ID: 823 3115 4607 Passcode: smbank

२) झूम मिटींग  जाँईन करण्यापुर्वी आपले पुर्ण नांव लिहीणे गरजेचे आहे (क्रियाशील सभासदासाठी व मिटींग हजेरीसाठी संपूर्ण नाव लिहीणे अत्यंत आवश्यक आहे.)

३) ऑनलाइन मिटींग दरम्यान आपला व्हिडीओ सुरु ठेवावा.

४) बँकेचा सन २०२०-२१ चा संपूर्ण वार्षिक अहवाल बँकेच्या वेबसाईट www.smbank.in वर उपलब्ध आहे. किंवा खालील नमूद केलेल्या लिंकला क्लीक करुन वार्षिक अहवाल पाहण्यासाठी डाऊनलोड करावा ही विनंती.

https://smbank.in/download/AnnualReport.pdf

५) बँकेच्या सन २०२०-२१ मधील कामकाजाबाबत सन्माननीय सभासदांच्या काही सूचना व प्रश्न असल्यास त्या त्यांनी लेखी स्वरुपात अर्ज बँकेच्या संगमनेर येथील प्रधान कार्यालयात समक्ष, पोस्टाने, कुरिअर किंवा ई-मेलव्दारे गुरुवार दि.२३/०९/२०२१ पर्यंत सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मिळतील अशा रितीने पाठवावे.

६) आपल्याला ऑनलाइन मिटींग मध्ये काही विषय / सूचना मांडायचे असल्यास अथवा चर्चेत भाग घ्यावयाचा असल्यास झूम ॲपच्या माध्यमाने Raise Hand या विकल्पाचा वापर करावा.

७) बँकेचा सन २०२०-२१ अखेरचा ऑडीट रिपोर्ट व ५५व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त बँकेच्या कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत बँकेच्या संगमनेर येथील प्रधान कार्यालयात पहावयास मिळेल.तसेच वार्षिक अहवाल प्रत बँकेच्या ८ शाखा व प्रधान कार्यालय,संगमनेर येथे सभासदास फक्त पाहण्यासाठी व वाचण्यासाठी नोटीस बोर्डवर उपलब्ध आहे.

८) ऑनलाइन गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास सदरची सभा त्याच दिवशी ऑनलाइनवर त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सुरु करण्यात येईल. अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

९) कृपया सभासदानी आपला  मोबाईल नंबर /ईमेल आयडी बँकेकडे फॉर्म भरुन व सही करुन जवळच्या कोणत्याही शाखेत द्यावा. ज्यांनी अद्याप भरुन दिला नसल्यास त्यांनी तत्काळ कोणत्याही शाखेत नमुना फॉर्म त्वरीत सभेपुर्वी अवश्य भरुन द्यावा ही विनंती व सहकार्य करावे.

१०) सभासदांची सन २०२०-२१ च्या सभेतील ऑनलाइन उपस्थिती ही क्रियाशील सभासदत्वासाठी ग्राह्य धरली जाईल.

११) मालपाणी हेल्थ क्लब संगमनेर हे सभास्थान मानन्यात येईल. तरी सदर सभेस सभासदांनी फक्त ऑनलाईन उपस्थित रहावे हि विनंती. सदर उपस्थिती क्रियाशील सभासदत्वासाठी ग्राह्य धरण्यात येईल.

## मतदानासाठी पात्रता निकष

### सभासदांना आवाहन

**१. किमान रु.१०००/- चे भागभांडवल धारण केलेले पाहिजे.**
**२. किमान रु.५०००/- ची ठेव (ठेवधारक) किंवा रु.५०,००० चे कर्ज (कर्जदार) घेतले असले पाहिजे.**
**३. सलग पाच वर्षामध्ये (२०१६-१७ ते २०२०-२१) किमान एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थिती आवश्यक. (ऑनलाईन उपस्थिती ग्राह्य धरण्यात येईल.)**



**राजेश ओंकारनाथ मालपाणी**
चेअरमन

# मनोगत..

**आदरणीय सभासद,**

**आपणा सर्वांचे मनःपूर्वक स्वागत,**

बँकेचे संस्थापक चेअरमन कै. ओंकारनाथजी मालपाणी व त्यांचे सर्व सहकारी संस्थापक मित्र यांच्या अथक परिश्रमातून १९६६ साली स्थापन झालेल्या आपल्या बँकेच्या वाटचालीचा समृद्ध वारसा पुढे नेण्याची संधी आपण आम्हा सर्व सहकारी संचालक मंडळास मोठ्या विश्वासाने दिली यासाठी पुनःश्च धन्यवाद.

आपल्या बँकेच्या सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचा प्रगतीचा ५६वा वार्षिक अहवाल मंजूरीसाठी सादर करीत आहे. कोरोना पार्श्वभूमीवर आयोजित ऑनलाईन वार्षिक सभेस आपण आवर्जून हजर राहिलात त्याबद्दल मनःपूर्वक आभार!

आर्थिक वर्ष २०२०-२१ या कालावधीचा वार्षिक अहवाल ताळेबंदपत्रक, नफातोटापत्रक, नफावाटणी व अंदाजपत्रक मा.संचालक मंडळ व सर्व स्टाफ सहकाऱ्यांच्या वतीने सादर करतांना व कोरोना महामारीच्या बिकट संकटातून सुद्धा आपण आर्थिक प्रगती साध्य केली याचा आनंद आहे.

**कोरोना संकट व अर्थव्यवस्था:**

२०२० च्या वर्षा अखेरीस जगाला न कळालेला कोरोना संकटाने भारतीय अर्थव्यवस्था व बँकिंग क्षेत्रास मार्च २०२० पासूनच अर्थचक्राच्या अनिश्चिततेच्या सीमा दाखवून दिल्या. कोरोना साथीने विश्वभरातील सामाजिक, औद्योगिक, वैद्यकीय व आर्थिक अशा सर्वच क्षेत्रातील घटकांना प्रचंड त्रास व ताण सहन करावा लागला.

सदरचा अनिश्चिततेचा लंबक स्वैरपणे हेलकावेच घेत आहे. त्यामुळे उद्योग, व्यापार, नोकरी, मागणी, उत्पादकता, उत्पन्न हे सगळेच सर्व अर्थचक्र अनिश्चित काळाकरिता दोलायमान झाले आहे. सन २०२०-२१ हे कोरोनाचे पहिले वर्ष अधीकच आव्हानाचे होते. कोरोना साथीने येणारा काळ पूर्णपणे बदलून टाकलेला आहे. पण प्रत्येक बदल आपल्याला अनेक गोष्टी शिकवतो व सावध करतो. व त्यातून संधी निर्माण करावयाच्या असतात.

बँकिंग अर्थव्यवस्थेला व आपल्या बँकेला सुद्धा याची झळ बसली . अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचा वेग उणे (निगेटिव्ह) झाला हे आपण सगळे जण जाणतो. तुलनात्मक अभ्यास व विचार करता आपल्या बँकेची अर्थस्थिती व पुनश्च प्रगती क्षमतेकडे वाटचाल ही नक्कीच आशादायक ठरली आहे व त्याचं संपूर्ण श्रेय हे कार्यशील स्टाफ सहकारी व सर्व सन्माननीय बँक सभासद, ठेवीदार/कर्जदार व हितचिंतकांचं आहे.



पिन नंबर देतांना तो सहज लक्षात येणार नाही असा ठेवावा.

**सक्षम संगमनेर मर्चंट बँक:**

अहवाल सालात प्रतिकूल कोरोना परिस्थिती असूनही सर्व सभासदांच्या व ठेवीदारांच्या अमूल्य सहकार्याने बँकेस नेत्रदिपक नाही परंतु उत्तम प्रगती साध्य करता आली हे नमूद करण्यास मला आनंद वाटतो.

आपले बँकेने रिझर्व्ह बँकेचे सर्वच निकष तंतोतंत पाळण्याचे सातत्य टिकविल्याने आपली बँक आर्थिकदृष्ट्या भक्कम आणि सुयोग्य व्यवस्थापन असलेल्या FSWM (Financially Sound and Well Managed) या रिझर्व्ह बँकेच्या मानांकनास प्राप्त ठरली आहे.

दि. ३१ मार्च २०२१ अखेर सरकारी वैधानिक लेखा परिक्षण पूर्ण झालेले असून बँकेस ऑडिट वर्ग '**अ**' मिळालेला आहे. अहवाल सालात सभासदांना त्यांच्या भागावर १२% लाभांश देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला असून त्यास मान्यता द्यावी ही विनंती. अनेक छोटे उद्योजक, व्यावसायिक, व्यापारी, बांधकाम व हॉटेल क्षेत्राची कोरोना काळातील परिस्थिती बिकट झाली, तरी सुद्धा आपल्या बँकेने सन २०२०-२१ मध्ये निश्चितच उत्तम प्रगती केली आहे हे आपणांस खालील तुलनात्मक स्थितीवरून सहज समजेल. बिझनेस ची वृद्धी समाधानकारक असली तरी विविध व्यवसायांवर आलेल्या अडचणींमुळे NPA मधे मार्च अखेर वाढही झालेली दिसते. त्यावरही उपाययोजना केल्याने चित्र सुधारत आहे.

(रुपये हजारात - राऊंडअप)

| तपशील | 31 मार्च 2020 | 31 मार्च 2021 | वाढ | वाढ % |
|---|---|---|---|---|
| भांडवल व निधी | 41,99.62 | 46,17.93 | 4,18.31 | 9.96% |
| ठेवी | 328,66.51 | 355,03.84 | 26,37.33 | 8.02% |
| कर्जे | 210,39.00 | 235,59.94 | 25,19.98 | 11.98% |
| एकूण बिझनेस | 539,06.47 | 590,63.78 | 51,57.31 | 9.57% |
| गुंतवणूक | 123,13.20 | 145,32.13 | 22,18.93 | 18.02% |
| निव्वळ नफा | 2,87.68 | 3,02.52 | 14.84 | 5.16% |
| भांडवल पर्याप्तता प्रमाण | 15.23% | 15.15% | | -0.08% |
| थकबाकीचे प्रमाण | 4.68% | 3.99% | | -0.69% |
| ग्रॉस एनपीए | 4.92% | 6.27% | | 1.35% |
| नेट एनपीए | 1.69% | 3.00% | | 1.31% |

**सभासदांचे जीवनमान व आर्थिक स्तर उंचविण्याचा प्रयत्न - आर्थिक सवलत व मदत -**

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात व कोरोना संकट काळात सभासदांचे हिताचे व सवलतीचे अनेक निर्णय संचालक मंडळाने घेतले. सभासद व कर्जदाराचा जास्तीत जास्त फायदा कसा होईल व सभासदांचे आर्थिक हितास प्राधान्य देऊन त्यांचे जीवनमान उंचविण्याचा व कोरोना संकटावर मात करण्यासाठी विविध निर्णय घेतले व बँक सेवक वृंदामार्फत जीव धोक्यात घालून कोरोना साथीच्या कठीण प्रसंगात सुद्धा उत्तम ग्राहक सेवा अविरत व अखंड देण्यात आली तसेच एकूण ११ एटीएम सेंटरमधून ८ शाखांतून अखंडपणे रोख रक्कम अहोरात्र २४ तास पुरवून Any Time Money चा आपल्या बँकेचा वारसा जपला आहे ही अभिमानास्पद व गौरवाची बाब आहे. त्याबद्दल सर्वांचे खूप खूप आभार. कठीण समय येता कोण कामास येतो या म्हणीप्रमाणे काहीसा हातभार लावण्याचा प्रयत्न आपल्या संगमनेर मर्चंटस् बँकेने केला आहे.

**सभासद कल्याण निधी - आर्थिक मदत व विमा -**

आपल्या बँकेने सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात वर नमूद केलेल्या कोरोना आर्थिक मदती शिवाय खालीलप्रमाणे सभासदांना सभासद कल्याण निधीतून शस्त्रक्रिया व इतर आजारासाठी वैद्यकीय तसेच जनारोग्य विमा रकमेची मदत सुद्धा दिली आहे.

**अ) सभासदांसाठी असलेली जीवन आरोग्य योजना-**

| अ.नं. | योजनेचे नांव | आर्थिक मदत रक्कम कमाल मर्यादा | संख्या | भरणा केलेले प्रिमियम | सन 2020-21 मधील लाभार्थींची क्लेम संख्या | इन्शुरन्स क्लेम रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| (अ) | सभासद जनारोग्य मेडिक्लेम इन्शुरन्स पॉलिसी | 5000 | 4128 | 4,09,167 | 66 | 3,26,627 |

**ब) सभासदांसाठी बँकेमार्फत देण्यात येणारी दुर्धर व मोठ्या आजारासाठी वैद्यकीय आर्थिक मदत योजना -**

| अ.नं. | योजनेचे नांव | वैद्यकीय कारणासाठी मदत रक्कम कमाल मर्यादा | आर्थिक मदत | सन 2020-21 मधील लाभार्थींची संख्या | मदत रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| (अ) | सभासद कल्याण निधी वैद्यकीय आर्थिक मदत योजना (शस्त्रक्रिया व इतर आजार) | 10,000/- | बँकेच्या सभासद कल्याण निधीतून | 25 | 2,16,787/- |
| (ब) | सभासद कल्याण निधी वैद्यकीय आर्थिक मदत योजना (कोविड-19 आजार) | 5000/- | बँकेच्या सभासद कल्याण निधीतून | 88 | 4,33,750/- |
| | | | | एकूण मदत | 6,50,537/- |

**क) बँकेने राज्य व केंद्र सरकारला सन २०२०-२१ मध्ये रु. २ लाख रकमेची देणगी देऊन सर्वसामान्य पिडित कोरोना रुग्णांना सरकारचे माध्यमातून मदतीचा हातभार लावला आहे.**

**बँकेवर कोरोना काळातील कर्ज मोरॅटोरियमची १०% तरतुद:**

आपल्या बँकेने या आर्थिक वर्षात एकूण ५४ कर्जदार सभासदांना ६ महिने मोरॅटोरियमचा लाभ दिला त्यामुळे आर्थिक वर्षा अखेरीस मोरॅटोरियम घेतलेल्या कर्जदारांकडील एकूण येणे कर्ज रक्कम रु. १४ कोटी ६९ लाख ८३ हजार वर बँकेस मा.रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार १०% जादा तरतुद रक्कम रु. १ कोटी ४६ लाख ९८ हजार ३०० ची करावी लागली. सुदैवाने बँकेकडे बुडीत व संशयीत निधी ची रक्कम जादा होती त्यामुळे नविन १०% तरतुद बँकेस चालू आर्थिक वर्षात करावी लागली नाही. अन्यथा बँकेचा निव्वळ नफा त्यामुळे घटला असता. सदरचा लाभ घेणाऱ्या सभासदांना नम्र विनंती की, सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात त्यांनी त्यांची कर्ज खाती दरमहाचा हप्ता रक्कम भरून रेग्युलर / स्टॅण्डर्ड तर ठेवावीच परंतु त्यांनी मोरॅटोरियम दिलेल्या एकुण कर्ज रक्कमेच्या २०% रक्कम चालू २०२१-२२ या वर्षात कर्ज खात्यात भरणा केल्यास वरील नमूद केलेली तरतुदीची रक्कम कमी होऊन आपली बँक अधिक सशक्त ठेवण्यास मदत होईल. कृपया अवश्य सहकार्य करावे ही नम्र विनंती.

**कर्ज व्याजदर कपातः**

बँकेने २०२०-२१ कोरोना साथीच्या दुष्ट अर्थचक्रातून व व्यापार व्यवसाय बंद राहिल्यामुळे बँकेने नफ्याचा विचार न करता कर्जावरील व्याजदरात २ वेळा कपात करुन सभासद व कर्जदारांना भरावी लागणारी अधिक व्याजाची रक्कम त्यामुळे कमी करून पूर्वलक्षी ०१/०४/२०२० पासून व्याजदर कपात ०.५० व रिबेट वाढ ०.५०% करून व्याजाचा आर्थिक बोजा कमी करण्याचा प्रयत्न केला आहे.

**व्याजावरील व्याज सूट व अनुदान रक्कम** (Loan Interest on Interest Ex-gratia Amt) :

मा.केंद्र सरकार व मा.सर्वोच्च न्यायालय यांनी मा.रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकातील निर्देशानुसार विविध कर्जदारांना मार्च २०२० ते ऑगस्ट २०२० या ६ महिन्याच्या कोरोना कार्यकाळात बँकेने दरमहा व्याजाची जी रक्कम कर्ज खात्यास नांवे (डेबीट) टाकली त्या व्याजावरील व्याजाची (Interest on Interest) अनुदानाची एकूण रक्कम रुपये ४,९१,९२२ आपल्या बँकेने संबंधित पात्र कर्जदार सभासदांच्या कर्ज खात्यास जमा (क्रेडिट) करुन व सदरचे आर्थिक अनुदान केंद्र सरकार कडून मिळवून सभासद कर्जदारांना त्याचा प्रत्यक्ष फायदा बँकेने दिला आहे.

**रिबेट नियमांमध्ये सवलत - मोरॅटोरियम ६ महिने - मासिक देय हप्ते भरण्यास मुदतवाढः**

मार्च २०२० ते ऑगस्ट २०२० या ६ महिन्याच्या कोरोना महामारीमुळे व्यापार, व्यवसाय उद्योग बंद राहिल्यामुळे आपल्या बँकेचे जे सभासद दरमहाचे व्याज अथवा हप्ते वेळेवर भरू शकले नाहीत व इच्छा असूनही रिबेटसाठी पात्र ठरले नाहीत अशा सभासद कर्जदारांनी कोविड काळातील ६ महिन्यांचे नांवे पडलेले एकूण व्याज किंवा सदर दरमहाचे ६ देय (ड्यू) हप्ते एकरकमी किंवा टप्याटप्प्याने (मोरॅटोरियम न घेता) जरी व्याज / हप्त्याचा भरणा केला तरी विशेष व स्पेशल बाब म्हणून बँकेने सदरची रिबेट रक्कम कर्जदार सभासदांच्या कर्जखाती जमा केली आहे व त्याचा अनेक कर्जदार सभासदांना लाभ मिळाला आहे.

त्यामुळे गतवर्षाची रिबेट रक्कम रु. २ कोटी ७९ लाख ९९ हजार १७ मध्ये वाढ होऊन चालू वर्षा अखेरीस रिबेटची रक्कम ३ कोटी २० लाख ७८ हजार ३९८ झाली आहे. आपल्या बँकेने सभासदांचे हित लक्षात घेऊनच त्यांना जास्तीत जास्त रिबेट कोरोना संकट काळात कसे मिळेल याचाच विचार करुन नियमात सवलत दिली आहे. तसेच कोरोना काळात व्यापारी कर्जदार सभासद स्टॉक स्टेटमेंट देय तारखेस बँकेत पाठवू शकले नाहीत त्यांना सुद्धा त्याकाळासाठी विशेष सवलत देऊन बँकेने त्यांना रिबेट दिला आहे. यामुळे बँकेचा नफा जरी घटला तरी ग्राहकांचे हितासाठीच हे निर्णय घेण्यात आले.

बँकेकडून ज्या कॅश क्रेडिट ग्राहकांनी ६ महिन्याच्या कोरोना काळातील दरमहाचे व्याज वेळोवेळी अथवा एक रकमी भरून वर नमूद केल्याप्रमाणे रिबेट घेऊन कर्जे स्टॅण्डर्ड ठेवली व ६ महिन्याचा मोरॅटोरियम सुद्धा घेतला नाही व बँकेस अमुल्य सहकार्य केले त्याबद्दल या सर्व ग्राहकांना विशेष धन्यवाद देऊन मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

तसेच ज्या सभासदांनी टर्मलोन घेतले, परंतु कोरोना काळातील अडचणींमुळे ६ मासिक हप्ते भरू शकले नाहीत अशा ५४ कर्जदारांना आपल्या बँकेने मा.रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार रिझॉल्युशन फ्रेमवर्क १.०० मधील सूचनेनुसार मोरॅटोरियम मंजूर करुन ६ मासिक हप्ते भरण्यास मुदतवाढ देऊन त्याचेवरील आर्थिक ताणतणाव कमी करण्यासाठी मुदत दिली आहे.

**आधुनिक पिढीची गती-नविन तंत्रज्ञानाने प्रगतीः**

बँकिंग व्यवसायातील तंत्रज्ञानाचा वाढता वापर व त्यामध्ये होत असलेले दिवसेंदिवस आधुनिक बदल यामुळे तीव्र स्पर्धा वाढून खातेदारांकडून बदलणाऱ्या तंत्रज्ञानयुक्त बँकिंग सेवांची मागणी वाढली आहे. यामध्ये आपली बँक सुद्धा मागे न राहता कोअर बँकिंग सोल्युशन द्वारे अनेक सेवा सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्याची सविस्तर माहिती खाली देत आहे व अहवालात नमूद केली आहे. त्याचा अवश्य फायदा सर्वांनी यापुढे घ्यावा. पेपरलेस बँकिंग व फेसलेस बँकिंग संकल्पना पूर्ण करण्याचा मनोदय भविष्यात आहे. त्यासाठी आपली मोलाची मदत व सहकार्य अपेक्षित आहे.


ATM कार्ड हरवल्यास मोबाईल बँकिंग app(SMePAY) वापरून किंवा नजीकच्या शाखेत जाऊन त्वरित कार्ड block करून घ्या.

सर्व सभासद व खातेदारांना नम्र विनंती की, त्यांनी आपले मोबाईल नंबर बँकेत रजिस्टर्ड करून घ्यावे तसेच ई-मेल आय-डी बँकेस अवश्य द्यावा. याचे अनेक फायदे सभासद व खातेदारांना सहज मिळून सर्वाचा वेळ, पैसा व श्रम हे एक क्लिक करुन सहजपणे वाचतील व वाचवता येतील त्यासाठी आपल्या सर्वांच्या अमूल्य सहकार्याची अपेक्षा करतो.

**बँकेच्या आर्थिक वर्षातील तांत्रिक प्रगती** (सन २०२०-२१):

**राहता ATM** - बँकेच्या सुट्टीच्या दिवशी राहता / शिर्डी परिसरातील ग्राहकांना एटीएम सुविधा मिळत नव्हती व परिणामी पैसे काढण्यासाठी श्रीरामपूर व लोणी अशा ठिकाणी ग्राहकांना जावे लागत त्यामुळे संगमनेर मर्चंटस् बँकेने पुढाकार घेऊन राहता शहराला २४ तास कॅश देणारे असे एटीएम बसवावे अशी ग्राहकांची व राहता परिसरातील नागरिकांची मागणी लक्षात घेऊन व तेथील ग्राहकांच्या सुविधेसाठी राहता शाखेला ATM सुरु करण्याचा संचालक मंडळाने निर्णय घेतला व या आर्थिक वर्षात राहता शाखेच्या व इतर बँकांच्या ग्राहकांना 24 x 7 ATM कॅश उपलब्ध व्हावी या उद्देशाने ATM ची सुरुवात करण्यात आली.

**घुलेवाडी ATM** - घुलेवाडी शाखा व परिसरात मोठेमोठी महाविद्यालये आहेत. मोठ्या प्रमाणावर बाहेरगावचे विद्यार्थी तेथे राहतात. परंतु ATM ची पूर्ण वेळ सुविधा त्या ठिकाणी उपलब्ध नसते. ही बाब लक्षात घेऊन विद्यार्थी, साखर कारखान्यातील कर्मचारी व परिसरातील नागरिकांच्या सुविधेसाठी घुलेवाडी शाखेत सुद्धा 24 x 7 कॅश देणारे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे नवीन एटीएम मशिन बसविण्यात आले. आजमितीला आपल्या बँकेच्या सर्व शाखा ATM सेवा देत आहेत.

**ग्रीन पीन सुविधा** - ग्राहकांना आपला ATM चा पिन विसरल्यास किंवा हरवल्यास तो Reset करण्यासाठी बँकेत अर्ज करावा लागत असे. त्या नंतर आठ दिवसांच्या कालावधीनंतर त्यांना तो बँकेकडून दिला जात असे. ही सर्व वेळखाऊ व किचकट पद्धत होती. ग्राहकांचा वेळ व पैसा दोन्ही वाचवावे या उद्देशाने बँकेने ग्रीन पिन सुविधाची सुरुवात केली. जेणेकरून ग्राहकांना आपला पिन त्वरित बदलता येतो व त्यासाठी कुठलेही अतिरिक्त चार्जेस ही बँकेला द्यावे लागत नाही.

**इन्कम टॅक्स रिफंड सुविधा** - बऱ्याच वर्षापासून ग्राहकांची मागणी होती की इन्कम टॅक्स रिफंडसाठी संगमनेर मर्चंट बँकेचे अकाउंट वापरण्याची सुविधा मिळावी. ही मागणी लक्षात घेऊन ग्राहकांच्या सुविधेसाठी संगमनेर मर्चंट बँकेचे खाते इन्कम टॅक्स ला अपडेट करता यावे यासाठी Income Tax व National Payment Corporation of India यांच्याशी tie-up करून सीबीडीटी प्रोजेक्ट सुरु करण्यात आला. आता आपले ग्राहक संगमनेर मर्चंटस् बँकेचे खाते इन्कम टॅक्स साईट वर रिफंडसाठी अपडेट करु शकतात त्या खात्यावर इन्कम टॅक्स रिफंड सुद्धा येत आहेत. अशा प्रकारची सुविधा देणारी महाराष्ट्रातील मोजक्या को-ऑपरेटिव्ह बँकेमध्ये संगमनेर मर्चंट बँकेचा नंबर लागतो. **तसेच ही सुविधा देणारी अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर मर्चंट बँक ही पहिलीच को-ऑपरेटिव्ह बँक ठरली आहे.**

**ATM कार्ड सिक्युरिटी** - सायबर गुन्हेगारापासून ग्राहकांचा ATM चा डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी व एटीएम कार्ड ग्राहकांच्या सुरक्षितेसाठी कार्ड सेफ ही सुविधा सुरु करण्यात आली. त्यानुसार ग्राहकांना आपल्या ATM कार्ड, POS, ECOM यांचे Daily Transaction Limit सेट करणे किंवा व्यवहार तात्पुरते बंद किंवा चालू करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अशा प्रकारची सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देणारी अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर मर्चंट्स ही पहिली को-ऑप. बँक आहे.

**मुख्य शाखेतील तिसरे ATM** - मुख्य शाखेतील दोन्ही ATM अतिशय अल्प काळात अविरत सेवा व Any Time Money मुळे ग्राहकांच्या पसंतीच्या पहिल्या क्रमांकावर उतरले आहे. या दोन्ही ATM ला मिळालेला प्रतिसाद पाहता ग्राहकांना फार वेळ रांगेत उभे राहण्याची वेळ येऊ नये यासाठी मुख्य शाखेत आणखी एक नवीन तिसरे एटीएम सुरु करण्यात आले तसेच ग्राहकांची ५० रु. तिसऱ्या ATM च्या माध्यमातून मिळावे ही मागणी सुद्धा पूर्ण व्हावी हे लक्षात घेऊन या ATM च्या माध्यमातून ५० रु. सुद्धा ग्राहकांना मिळतील याची व्यवस्था करण्यात आली. **महाराष्ट्रात ५० रु. देणारे ATM संगमनेर मर्चंटस् बँकेने सुरु केले ही सुद्धा विशेष बाब आहे.**

**डाटा सेंटर सायबर सिक्युरिटी -**

सध्याच्या काळात सायबर सिक्युरिटी हा बँकांपुढे असणारा फार मोठा यक्ष प्रश्न आहे. व हा प्रश्न सोडविण्यासाठी वेगवेगळ्या सिक्युरिटी फीचर्स इन्स्टॉल करून आपला ग्राहकांचा डेटा कसा सुरक्षित राहील याकडे बँकेचे मुख्यत्वेकरून लक्ष असते. संगणक विभागाने मांडलेल्या सायबर सिक्युरिटी संदर्भातील बहुतेक सर्व सूचना संगमनेर मर्चंटस् बँक प्राधान्याने पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असते. त्या अनुषंगाने अधिक सुरक्षित अशी यंत्रणा करण्यासाठी अत्याधुनिक पद्धतीचे सिक्युरिटी फिचर्स व इन्स्टॉलेशन या आर्थिक वर्षात करण्यात आले. त्यामुळे डेटा सेंटरच्या सिक्युरिटीत आणखीनच भर पडली व ग्राहकांचा डेटा सुरक्षिततेची चिंता दूर झाली.

बँकेच्या डेटा सिक्युरिटीचे व अंमलबजावणीचे काम बँकेचे आयटी मॅनेजर विठ्ठल कुलकर्णी व त्यांच्या दोन सहकाऱ्यांनी अत्यंत कुशलतेने पूर्ण केले. त्याबद्दल त्यांचे खूप खूप धन्यवाद.

आपल्या बँकेची नेटवर्थ रू.५० कोटी नजीकच्या काळात झाल्यास लवकरच नेटबँकिंग सेवा देण्याचा मनोदय आहे.

**आभारः**

आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये सर्व सभासद, ठेवीदार तसेच ज्ञात-अज्ञात व्यक्ती व संस्था, मौलिक वेळ देणारे सर्वश्री व्हा.चेअरमन संतोष करवा, कर्ज उपसमिती चेअरमन प्रकाश राठी, थकबाकी वसुली उपसमिती चेअरमन दिलिपकुमार पारख, स्टाफ उपसमितीचे चेअरमन सुनील दिवेकर, संगणक उपसमिती चेअरमन सतिष लाहोटी, गुंतवणूक उपसमिती चेअरमन ओंकार सोमाणी, ऑडिट उपसमिती चेअरमन सीए संजय राठी व पर्चेस उपसमिती चेअरमन राजेंद्र वाकचौरे तसेच उपसमितीच्या सर्व संचालक सदस्यांनी व माझे सर्व सहकारी संचालक तसेच बँकेचे CEO ज्ञानेश्वर सुरम साहेब, AGM विजय बजाज साहेब व सर्व शाखांचे शाखाधिकारी, सर्व स्टाफ सहकारी यांनी कोरोना संकटात सुद्धा बँकेच्या प्रगतीसाठी जे अथक प्रयत्न केले व बँकेची विश्वासार्हता व पारदर्शक व्यवहाराची परंपरा कायम ठेवली त्या सर्वांचे मनापासून आभार व ऋण व्यक्त करतो.

**प्रभू जीवन पथ में पुण्य मिलें हम को, पग-पग पर सेवा का।**

**हो पूर्ण-लिया जो व्रत हमने, निष्काम निरंतर सेवा का।।**

या प्रार्थनेसह मनोगतास पूर्णविराम देतो. धन्यवाद..

**जय सहकार! जय भारत!!**

**आपला कृपाभिलाषी,**

Rajesh O. Malpani

**राजेश ओंकारनाथ मालपाणी**
चेअरमन

स्थळ - संगमनेर
दिनांक - ०२/०९/२०२१



ATM मशिन मध्ये कार्ड अडकल्यास केवळ बँक कर्मचार्याचीच मदत घ्यावी. ईतर व्यक्तीची मदत घेतल्यास आपली फसवणूक होऊ शकते.

# ५६ व्या वार्षिक अहवालाचा गोषवारा..

**माननीय सभासद,**

आपल्या बँकेचा आर्थिक वर्ष २०२०-२१ चा ५६ वा वार्षिक अहवाल सादर करताना आनंद होत आहे.आपल्या बँकेच्या सध्याच्या सहाव्या दशकातील बँकिंग प्रवास व त्यातील आर्थिक वर्ष २०२०-२१निश्चितच सोपे नव्हते किंबहुना संपूर्ण जग व भारत देश महाभयंकर कोरोना संसर्ग साथीच्या महामारी रोगामुळे अनेक आव्हानांचा सामना करीत होते व त्याला आपली बँक सुद्धा अपवाद नाही. अशा खडतर काळात सुद्धा बँकेची उत्तम प्रगती ही केवळ आपल्या मर्चट बँकेची असलेली ख्याती, सन्माननीय सभासद व ठेवीदारांचा विश्वास, पारदर्शक व्यवहार यांचा त्रिवेणी संगम होय. तसेच सभासद व ठेवीदार यांच्या सक्रिय व सतत प्रयत्नांमुळेच बँक आज सक्षम झाली आहे व प्रगतीपथावर आहे त्यासाठी सर्व सहकारी संचालकांचे सतत सहकार्य मिळाले आहे हे नमूद करण्यास मला अभिमान वाटतो.

आपण आज दुसऱ्यांदा ऑनलाइन पद्धतीने वार्षिक सभा आयोजित केली आहे व त्यासाठी आपण उपस्थित राहिलात त्याबद्दल आपले मनःपूर्वक स्वागत व आभार.

आजच्या ऑनलाइन सभेत आपणासमोर ३१ मार्च २०२१ अखेरचा ताळेबंद पत्रक, सन २०-२१ चे नफा तोटा पत्रक व सन २१-२२ चे अंदाजपत्रक मंजुरीसाठी ठेवले आहे. तसेच मा. रिझर्व बँकेच्या निर्देशानुसार बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व सरकारी ऑडिटर यांच्या नेमणुकी चा विषय मा.रिझर्व बँकेच्या मान्यतेस अधीन राहून मंजुरीसाठी ठेवला आहे. कृपया नफा वाटणी व लाभांश वाटपा सह विषयपत्रिकेवरील अन्य विषयास आपण सर्वानुमते मंजुरी द्यावी अशी विनंती संचालक मंडळाच्या वतीने आपणास करीत आहे.

**सहकार व अर्थ प्रवाह -**

स्वातंत्र्यापासून देशाच्या अर्थव्यवस्थेत काम करीत असलेल्या नागरी सहकारी बँकांचा अर्थ प्रवास हा सर्वसामान्य ठेवीदारांच्या व सभासदांच्या अतूट विश्वासावरच चालला आहे. ठेवीदारांच्या व सभासदांच्या रिलेशन शिप मुळे व संपादन केलेल्या विश्वासामुळेच आज सहकार क्षेत्राने आपल्या सभासदांना सहज व सुलभ कर्ज वितरण करून शहरी,अर्ध शहरी व ग्रामीण भागातील आर्थिक प्रवाह कायम ठेवला आहे.

सभासदांचे जीवनमान उंचविण्यासाठी आपल्या बँकेने सुद्धा निश्चितच गेली ५६ वर्षे **रिलेशनशिप बँकिंग** तत्कालीन संस्थापक संचालकांनी व विद्यमान संचालकांनी केले आहे व जोपासले आहे. त्यामुळेच सभासद व ठेवीदारांच्या या रिलेशनशिप वरच आज आपल्या बँकेने ५६ व्या वर्षाअखेरीस नेत्रदीपक प्रगती केली आहे व त्याचा आर्थिक लेखाजोखा आपणासमोर सादर करण्यास मला आनंद व अभिमान वाटत आहे. निश्चितच याचे श्रेय सर्व सभासदांना आहे. ज्या सर्वसामान्य गरजु छोट्या छोट्या उद्योग, धंदा, व्यवसाय, नोकरी व व्यापार करणाऱ्या अनेक दुकानदारांना व सभासद कर्जदारांना त्यांच्यातील प्रामाणिकपणा व व्यापार बुद्धि तील प्रतिभा व गरज ओळखून कर्ज मंजूर करून त्यांना मोठं करून व त्यांच्या अडीअडचणींचा व गरजेचा विचार करून सभासदांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न आपल्या बँकेने केला आहे. या सर्व छोट्या व मध्यम व्यापार उद्योगधंद्यातूनच पुढे अनेकांना उत्पन्नाचे साधन व नोकऱ्या मिळालेल्या आहेत व सभासदांना आर्थिक मदत करून त्यांची व बँकेची प्रगती करण्याचा सर्व संचालकांनी सतत प्रयत्न केले आहेत हे नमूद करणे माझे कर्तव्य समजतो.

**कोरोना वर्ष २०-२१ व नवीन आव्हाने -**

आर्थिक वर्ष सन २०-२१ चा आर्थिक प्रवास, विकास व प्रगती निश्चितच सोपी नव्हती किंबहुना जगभर व देशभर कोरोना ने थैमान घातले होते. मार्च २० ते मे २० च्या सुरुवातीच्या तिमाहीत तर देशभरातील सर्व व्यापार व जनजीवन गोठून गेले होते. सर्व जनता घरातच राहून अचानक आलेल्या कोरोना साथीच्या भयावह रोगाचा प्रतिकार व बचाव करीत होती. त्यानंतर पुनश्च जून २० ते ऑगस्ट २० या तिमाहीत सुद्धा कोरोना ची तीव्रता जाणवतच होती. त्यामुळे आर्थिक विकास व प्रगतीचा देशाचा व बँकिंग अर्थव्यवस्थेचा आलेख हा उणे म्हणजेच निगेटिव्ह राहिला आहे व त्याचे गंभीर परिणाम एकूण अर्थव्यवस्थेवर व बँकिंग क्षेत्रावर सुद्धा झाले आहेत.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे या खडतर व महामारी च्या कोरोना काळातसुद्धा आपल्या बँकेच्या सर्व सेवकांनी अखंड ग्राहक सेवा व एटीएम सेवा देऊन निरंतर उत्तम ग्राहक सेवेचा वसा कायम ठेवला ही अभिमानास्पद बाब आहे. याशिवाय बँकेच्या सर्व संचालकांनी, सभासद व खातेदारांच्या तसेच सेवक वर्ग यांच्या सोयीसाठी व सुरक्षेसाठी ठीक ठिकाणी सॅनीटायझर ची सोय, सुरक्षित अंतर ठेवून ग्राहक सेवा सतत देण्यासाठी ठीक ठिकाणी ग्लास पार्टिशनची सोय व सर्व सेवकांना मास्क सुविधा प्रदान करण्यात आली. तसेच कोरोना काळातील आजारपणासाठी बँकेकडून सभासद व सेवकांना आर्थिक मदत व विमा लाभ देऊन जीवन सुरक्षा व जीवन सुसह्य करण्याचा अथक प्रयत्न केला आहे हे नमूद करण्यास मला अभिमान वाटतो. इतकेच नव्हे तर या कोरोना काळात सभासद व कर्जदारांना सुद्धा विविध आर्थिक सवलती व मदत माझ्या मनोगता मध्ये नमूद केल्याप्रमाणे आपल्या बँकेने देऊन नेहमीच सभासदांच्या हितासाठी एक मताने निर्णय घेतला आहे तसेच शासनाच्या निर्देशांचे पालन करून स्वच्छता -सुरक्षितता -मास्क वापर या त्रिसूत्रीचा अंमल योग्य व काटेकोरपणे केला त्यामुळेच आज **आपला मर्चंट बँक परिवार** हा कोरोनाशी सामना करून व कठीण नवीन आव्हाने येऊन सुद्धा सदृढ व सुरक्षित आहे याचा आपणा सर्वांना सार्थ अभिमान आहे.

**पुढील आर्थिक वेध- विकास व डिजिटल बँकिंग सेवा -साक्षरता -**

कोरोना काळाच्या सहा महिन्यानंतर सुद्धा आर्थिक व बँकिंग क्षेत्र, औद्योगिक क्षेत्र व सेवा क्षेत्रातील मंदी आर्थिक वर्ष २०-२१ च्या तिसऱ्या ऑक्टोबर २० ते डिसेंबर २० या तिमाही अखेरपर्यंत जाणवली.त्यामुळेच चांगली कर्जे सुद्धा एन पी ए कडे जाऊ लागली. या मंदीच्या पार्श्वभूमीवर अहवाल वर्षाच्या शेवटच्या चौथ्या तिमाहीत म्हणजेच जानेवारी २१ ते मार्च २१ या काळात थोडा आर्थिक विकास जाणवला व बँकिंग अर्थव्यवस्था हळूहळू उभारी घेऊ लागली. त्यामुळेच थोडे आशादायक प्रगतीचे रूप दिसू लागले. कोरोना ने मानव जातीस खरच खूप काही शिकवले. त्यामुळेच आज ग्राहक सेवे चा वसा सतत व कायम ठेवण्यासाठी नाविन्यपूर्ण व आधुनिक तंत्रज्ञानाची कास आपल्या बँकेने धरून अनेक डिजिटल सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत व **मर्चंट फर्स्ट- डिजिटल बँक** दृष्टिकोन स्वीकारला आहे.

बँकेच्या आयटी विभागाने आज पावेतो अहवालात व खालील प्रमाणे नमूद केलेल्या अनेक डिजिटल सेवा- सुविधा सभासद व खातेदारांना उपलब्ध करून देऊन डिजिटल साक्षरता अभियान पूर्वीपेक्षा अधिक जोमाने सुरू केले आहे व त्यास उत्तम प्रतिसाद मिळत आहे.आपणसुद्धा बँकेच्या नजीकच्या शाखेत जाऊन व आपला मोबाईल नंबर रजिस्टर करून या सर्व डिजिटल सेवा आपल्या मोबाईल द्वारे केव्हाही, कोठेही सहज घेऊ शकता व ग्रीन बँकिंग संकल्पना अमलात आणू शकता. याशिवाय सायबर फ्रॉड व फसवणुकी पासूनची सुरक्षितता व डेटा मॅनेजमेंट ची उत्तम जबाबदारी बँकेच्या आयटी विभागाचे मॅनेजर श्री विठ्ठल कुलकर्णी व त्यांच्या सहकारी वर्गाने योग्य वेळेवर बँकेस देऊन मौलिक साथ दिली तसेच संगणक उपसमितीचे चेअरमन श्री सतीश लाहोटी व समिती संचालकांनी एकमताने निर्णय घेऊन त्यास तात्काळ मंजुरी दिली त्याबद्दल सर्वांचे आभार



● ए.टी.एम च्या बाहेर येऊन पैसे मोजू नये, ते आत मध्येच मोजून घ्यावे.

**मोबाईल बँकिंग सेवा सुविधा -**

- रुपये २ लाख पर्यतची खात्यातील रक्कम सहज दुसऱ्याला हस्तांतरण/ट्रान्सफर करा व 24 x 7 x 365 दिवस सदर सेवा सुविधेचा बँकेत न येता व कोणताही चेक न देता, चलन न भरता एक क्लिक द्वारे आपल्या रजिस्टर मोबाइल वरुन अवश्य फायदा घ्या.
- चेकबुक मागणीसुध्दा बँकेत न येता आपल्या मोबाईल वरूनच करा
- आपल्या खात्यातील शिल्लक रकमेची चौकशी बँकेत न येता मोबाईल वरून करण्याची सुविधा अवश्य वापरा
- आपल्या मोबाईल वरून एटीएम कार्ड हरवल्यास तात्पुरते अथवा कायमचे ब्लॉक करण्याची सुविधा बँकेत न येता व अर्ज भरून न देता अवश्य वापरा.

**पॉझिटिव्ह पे सिस्टीम** (PPS) -

- आपण रुपये ५० हजार व त्यावरील रकमेचा चेक कोणासही दिल्यास त्याची पूर्वसूचना खातेदाराने बँकेला लेखी कळविण्याची सक्ती, सूचना व निर्देश रिझर्व बँकेने दिले असून त्याची अंमलबजावणी दि.१.९ .२०२१ पासून सुरू करण्यात आली आहे. खातेदारांना अशा प्रकारची दिलेल्या चेकची पूर्वसूचना बँकेस देण्यासाठी आपल्या बँकेने मोबाईल ॲप मध्येच **पॉझिटिव्ह पे सिस्टीम** खातेदारांना उपलब्ध करून दिली आहे व त्यासाठी बँकेत समक्ष न येता व चेक दिल्याचे लेखी सुचनापत्र शाखेत न देता सुद्धा प्रत्येक खातेदार त्यांच्या मोबाईल वरूनच अशा प्रकारची पूर्वसूचना बँकेस चेक देण्यापूर्वी किंवा चेक दिल्याबरोबर आपल्या रजिस्टर मोबाईल वरून एक क्लिक करून सहज पाठवू शकतो. सदरची सेवासुद्धा नुकतीच आपल्या बँकेने सुरू केली आहे त्याचा अवश्य लाभ सर्व खातेदारांनी घ्यावा व आपला वेळ, श्रम व चेक रिटर्न जाण्याचा त्रास कमी करावा व पीपीएस सेवेचा त्वरित लाभ घ्यावा ही नम्र विनंती या प्रसंगी करतो.

**ईएमव्ही रूपे डेबिट कार्ड सेवा सुविधा -**

बँकेकडून दिलेल्या ईएमव्ही रूपे कार्ड चा शॉपिंग, पीओएस सेवा, ई-कॉम सेवा (वीज बिल भरणा, टेलिफोन बिल भरणा , मोबाईल रिचार्ज, रेल्वे रिझर्वेशन) सेवा इत्यादी साठी सहज व सुरक्षितपणे अवश्य करा.

**पासबुक प्रिंटिंग सेवा व कॅश डिपॉझिट सेवा -**

बँकेने 24 x 7 व 365 दिवस पासबुक प्रिंटिंग खातेदारांना उपलब्ध करून दिली आहे व रोख रक्कमसुद्धा केव्हाही खात्यात भरण्याची सेवा व सुविधा बँकेच्या मुख्य शाखा संगमनेर येथील नवीन नगर रोड येथे कॅश डिपॉझिट मशीन(सी डी एम) द्वारे उपलब्ध करून दिलेली आहे. त्याचा अवश्य लाभ खातेदारांनी घ्यावा ही विनंती.

**यु पी आय प्रोजेक्ट -**

आपल्या बँकेने पुढील वर्षामध्ये सन २१-२२ मध्ये यु पी आय प्रोजेक्ट अंमलबजावणी करण्यासाठी सुरुवात केली आहे व त्याची एन पी सी आय या रिझर्व्ह बँके मार्फत स्थापन झालेल्या फंडस् मॅनेजमेंट संस्थेमार्फत विविध टेस्टिंग ची पूर्तता करण्याचे काम सध्या आयटी विभागाकडून अविरतपणे चालू आहे. सदर यु पी आय म्हणजेच युनिफाईड पेमेंट इंटरफेस लाभ सुद्धा येत्या दोन-तीन महिन्यात बँकेच्या सभासद व खातेदारांना दिवाळी पूर्व देण्याचा बँकेचा मानस आहे व सदरची डिजिटल सेवा सुद्धा आपल्या सेवेत लवकरच सादर करून व त्या माध्यमातून **फोन पे ,गुगल पे इत्यादी सुमारे २०० पेक्षा जास्त ॲप च्या माध्यमातून आपल्या बँकेच्या खातेदारास सुद्धा सहजपणे ३६५ दिवस कोठूनही पेमेंट पाठविण्याची सुविधा लवकरच उपलब्ध होणार आहे.**



- ATM मधून पैसे काढतांना कुणालाही तुमचा पिन दिसणार नाही याची दक्षता घ्यावी

**नेट बँकिंग सेवा -**

येत्या दोन-तीन वर्षात नेट बँकिंग सेवा सुध्दा सुरु करण्याचा बँकेचा भविष्यातील उपक्रम आहे.त्यासाठी मा. रिझर्व बँकेची रुपये ५० कोटी बँक नेटवर्थ आवश्यकता ही अट आहे. लवकरच त्याचीही पूर्तता झाल्यावर आपली बँकसुद्धा सभासद व खातेदारांना सदरची नेट बँकिंगसेवा बँकेत न येता त्यांच्या दुकानातून व घरातून ३६५ दिवस देण्याचा मनोदय व संकल्प आहे. आपल्या बँकेची सध्याची नेटवर्थ रुपये ३० कोटी ६५ लाख आहे.

**सभासद -**

**अ) नियमित सभासद -**

आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस नियमित सभासद संख्या ५४९०होती. आर्थिक वर्षात मृत्यू अथवा राजीनामा मुळे १३८ सभासद संख्या कमी झाली व नवीन २१४ सभासद संख्या वाढून आर्थिक वर्षाअखेरीस एकूण नियमित सभासद संख्या ५५६६ आहे.

**ब ) प्रेफरन्शियल सभासद -**

अहवाल वर्षाच्या सुरुवातीस सदरची संख्या २७३१ होती. त्यामध्ये आर्थिक वर्षात १०६८ सभासदांची नव्याने वाढ होऊन आर्थिक वर्षाअखेरीस एकूण प्रेफरन्शियल सभासद संख्या ३७९९ आहे. सदरच्या सभासदांना मतदानाचा अधिकार नसतो व त्यांना दरवर्षी आठ टक्के व्याज रूपाने लाभांश दिला जातो. सदरचा रुपये शंभर चा एक प्रेफरन्शियल शेअर्स बँकेकडून जे कर्जदार तात्पुरत्या स्वरूपाचे कर्ज जसे सोने तारण किंवा दुचाकी वाहन साठी घेतात त्यांना दिला जातो.

परंतु नुकतेच मा. रिझर्व बँकेने व सरकारी ऑडिटर यांनी सदर चे प्रेफरन्शियल शेअर रक्कम ही शेअर लिंकिंग साठी वापरण्याबाबत बँकेस सूचित केले आहे व त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

**क) नाममात्र सभासद**

आर्थिक वर्षाअखेरीस एकूण नाममात्र सभासद संख्या ८१० असून त्याचे प्रमाण १४.५५% आहे. मा. रिझर्व बँकेच्या असलेल्या २०% निकषचे आपल्या बँकेने पालन केले आहे.

**वसूल भाग भांडवल -**

अहवाल वर्षाच्या सुरुवातीस बँकेचे नियमित सभासदांचे वसूल भागभांडवल रुपये ८,१०,८५,०००/- होते त्यामध्ये अहवाल वर्षात रुपये ३,१३,०००/-ची वाढ होऊन रुपये २१,५७,०००/-चे भाग भांडवल परत केले त्यामुळे आर्थिक वर्ष अखेरीस एकूण वसूल भाग भांडवल रुपये७,९२,४१,०००/-चे आहे. तसेच अहवालाच्या सुरुवातीस प्रेफरन्शियल भाग भांडवल रुपये२,७४,०००/- होते त्यामध्ये अहवाल वर्षात रु.१,०७,०००/- ची वाढ होऊन आर्थिक वर्षाअखेरीस एकूण प्रेफरन्शियल भाग भांडवल रु.३,८१,०००/-चे आहे. अशाप्रकारे बँकेचे आर्थिक वर्षाअखेरीस एकूण वसूल भाग भांडवल रुपये ७,९६,२२,०००/- आहे.

**राखीव व इतर निधी -**

अहवाल वर्षाच्या सुरुवातीस एकूण राखीव व इतर निधी रक्कम रुपये३३,८६,०३,०००/- होता त्यामध्ये अहवाल वर्षात रुपये ४,३५,६८,०००/-ची वाढ होऊन आर्थिक वर्षाअखेरीस सदरचा एकूण निधी रुपये ३८,२१,७१,०००/- आहे. अशाप्रकारे वसूल भागभांडवल व राखीव तसेच इतर निधी मिळून आर्थिक वर्षाअखेरीस बँकेचा एकूण निधी रुपये ४६,१७,९३,०००/-झाला आहे.

गतवर्षाच्या तुलनेत त्यामध्ये रुपये ४,१८,३१,०००/-ने भरीव वाढ झाली आहे व उत्तम निधीच्या भक्कम पायावर आज आपली बँक उभी आहे. यावरूनच ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षित असून स्वनिधी हा बँकेच्या सक्षम आर्थिक स्थितीचे प्रतिबिंब दाखवतो.



EMV चीपबेस कार्डचीच बँकेकडे मागणी करावी.

**नेटवर्थ -**

बँकेच्या सरकारी ऑडिट रिपोर्ट नुसार अहवाल वर्षाअखेरीस आपल्या बँकेची एकूण नेटवर्थ रुपये ३०,६५,००,०००/- आहे. सदरची नेटवर्थ रुपये ५० कोटी झाल्यास आपल्या बँकेस मा. रिझर्व बँकेच्या पूर्वपरवानगीने नेट बँकिंग सेवा सुरू करता येईल. लवकरच येत्या दोन-तीन वर्षात रुपये ५० कोटी नेटवर्थ भांडवल व निधी मध्ये वाढ करून सभासद व खातेदारांचे नेट बँकिंग चे सेवेचे स्वप्न लवकरच पूर्ण करण्याचा मनोदय असून आपल्या सर्वाच्या सहकार्याने डिजिटल बँकिंग सेवेतील हा एक टप्पा व लक्ष्य लवकरच पूर्ण होईल अशी अपेक्षा याप्रसंगी व्यक्त करतो.

**भांडवल पर्याप्तता निधी (सी आर ए आर)**

भारतीय रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार भांडवल पर्याप्तता प्रमाण म्हणजेच सी आर ए आर हा किमान ९% असणे आवश्यक आहे. त्या तुलनेत आपल्या बँकेचे सदर प्रमाण आर्थिक वर्षाखेरीस १५.१५% इतके भक्कम आहे.आपल्या बँकेच्या सक्षम आर्थिक निधी व स्थितीचा हा आरसा आहे हे आपणास खालील आकडेवारी वरून दिसून येईल.

(रुपय हजारात)

| तपशील | दि. ३१-०३-२०२१ | दि. ३१-०३-२०२० |
|---|---|---|
| १. जोखीम मालमत्ता | २२७,९०,३९,००० | २०७,४५,०९,००० |
| २. टायर १ भांडवल | २६,४८,७४,००० | २४,४७,७६,००० |
| ३. टायर २ भांडवल | ८,०७,३८,००० | ७,१३,४६,००० |
| ४. सीआरएआर प्रमाण | १५.१५% | १५.२३% |

अहवाल वर्षात टायर १ व २ भांडवलात उत्तम वाढ झालेली आहे मात्र कर्ज रक्कम वाढल्यामुळे रिस्क वेट ॲसेट मध्ये सुद्धा वाढ झाली आहे त्यामुळे सी आर आर चे प्रमाण गत वर्षापेक्षा अल्प ०.०८% ने कमी झाल्याचे दिसत आहे.

**फायनान्शियल साऊंड अँड वेल मॅनेजमेंट बँक दर्जा -**

मा. रिझर्व बँक ऑफ इंडियाने निश्चित केलेले खालील सर्व आर्थिक मापदंड म्हणजेच फायनान्शिअल मेझरमेंट आपल्या बँकेने पूर्ण केलेले आहेत. त्यामुळेच बँकेचा **एफएस डब्ल्यूएम** चा दर्जा म्हणजेच आर्थिक सक्षम व उत्तम व्यवस्थापन असलेली आपली बँक आहे. सदर बाब सभासदांना अभिमानास्पद आहे हे नमूद करण्यास मला आनंद वाटतो.

मा. रिझर्व बँकेचे आपल्या बँकेने पूर्ण केलेले मापदंड खालील प्रमाणे

| अ.नं. | मापदंड | रिझर्व्ह बँक किमान निकष | बँकेची पुर्तता |
|---|---|---|---|
| १ | सी.आर.ए.आर | १०% | १५.१५% |
| २ | ग्रॉस एन.पी.ए | ७% | ६.२७% |
| ३ | नेट एन.पी.ए | ३% | ३% |
| ४ | निव्वळ नफा | सतत ३ वर्ष | सतत ५५ वर्षे |
| ५ | सी.आर.आर. व एल.एस.आर | कधीच कमतरता नको | कधीच कमतरता नाही |
| ६ | उत्तम अंतर्गत नियंत्रण व २ प्रोफेशनल डायरेक्टर | पालन आवश्यक | पालन केले आहे |
| ७ | कोअर बँकिंग सोल्युशन | पालन आवश्यक | पालन केले आहे |
| ८ | रेग्युलेटरी कम्फर्ट | पालन आवश्यक | पालन केले आहे |



● आपला मोबाईल नंबर बँकेत अद्यावत करा

**ठेवी व ठेव विमा -**

अहवाल सालात मागील वर्षाच्या तुलनेत रुपये २६,३७,३४,०००/-च्या ठेवी वाढून ३१ मार्च २१ अखेरीस एकूण ठेवी रुपये ३५५,०३,८४,०००/-झाल्या आहेत हे आपणास ताळेबंदा वरून दिसून येईल. एकूण ठेवी पैकी करंट व सेव्हिंग बचत खात्याचे म्हणजेच लो कॉस्ट (कासा) ठेवीचे प्रमाण १६.४३% इतके आहे. अहवाल सालात ठेवीवरील सरासरी व्याजाचा दर ६.५६% असून गतवर्षी तो ६.८१% होता. कमी व्याजदराच्या करंट व सेव्हिंग ठेवी वाढविण्यासाठी बँकेकडून सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहे. आपण सुद्धा आपले व आपल्या परिचित व्यक्तींचे व नातेवाईकांचे करंट व सेव्हिंग खाते आपल्या बँकेतच उघडून बँकेस मदत व सहकार्य करावे व बँकेकडून दिल्या जाणाऱ्या अनेक डिजिटल सेवेचा अवश्य लाभ घ्यावा ही अपेक्षा व्यक्त करतो.

कोरोना महामारी च्या काळात सुद्धा बँकेच्या एकूण ठेवीमध्ये गतवर्षाच्या तुलनेत रक्कम रुपये २६,३७,३४,०००/-ने वाढ झाली आहे हे निश्चितच आपल्या बँकेवरील सर्वसामान्य ठेवीदार व सभासदांचा असलेला प्रचंड विश्वास दर्शवितो. बँकेची जलद ग्राहक सेवा व पारदर्शक कारभाराचे हे उत्तम प्रतीक व प्रतिबिंब आहे असे मला वाटते त्याबद्दल सर्वाचे मनःपूर्वक आभार.

भारतीय रिझर्व बँकेच्या धोरणानुसार आपल्या बँकेने प्रत्येक ठेवीदारांचा रुपये ५ लाख ठेव रकमेचा विमा डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट कॉर्पोरेशन कडून उतरविला आहे. सदर ठेव विमा संरक्षणासाठी बँकेने ठेव विमा महामंडळाला आर्थिक वर्षात एकूण रुपये ४७,८१,०००/- चा विमा प्रीमियम भरून ठेवीदारांना सुद्धा विमा संरक्षण दिलेले आहे. सदर विमा संरक्षण हे बँक प्रत्येक वर्षी सदरचा ठेव विमा घेऊन ठेवीदारांना विमा कवच देत आहे. कारण ठेवीदार हा बँकेचा आत्मा आहे व आपल्या बँकेने ठेवीदारांचे प्रेम व विश्वास पारदर्शक कार्यातून संपादन केला आहे हे नमूद करण्यास व सांगण्यास मला खूप अभिमान व आनंद वाटतो. सर्व ठेवीदारांना बँकेच्या वतीने त्रिवार धन्यवाद.

**बाहेरील कर्जे (Borrowings) -**

आपल्या बँकेने अहवाल वर्षाअखेरीस एकूण रुपये ४,३१,१०,०००/-ची बाहेरील कर्जे घेतली आहेत. त्यापैकी रुपये ३,५०,२२,०००/- कर्ज ही रक्कम दैनंदिन बँक व्यवहारातील निधीचे नियोजन व खातेदारांच्या आरटीजीएस च्या मागणीमुळे आवश्यकतेनुसार मुदत ठेव गुंतवणुकीच्या पावतीवर तात्पुरत्या स्वरूपाचा ओव्हरड्राफ्ट घेऊन तसेच रुपये ८०,८८,०००/-इतकी रक्कम लाँग टर्म सब ऑर्डीनेट डिपॉझिट (एलटीडी) म्हणून सात वर्षे नंतर परतफेड करण्याच्या मुदतीने घेतलेले आहे.

**निव्वळ नफा व नफा वाटणी -**

आपल्या बँकेला चालू आर्थिक वर्षात सर्व कायदेशीर तरतुदी करून व इन्कम टॅक्स भरून शुद्ध म्हणजेच निव्वळ नफा रुपये ३,०२,५१,७३५=८७ इतका झाला आहे त्यामध्ये गतवर्षाचा शिल्लक नफा रुपये २७,१८७=०६ मिळवून सन २०-२१ चा एकूण रुपये ३,०२,७८,९२२=९३ निव्वळ नफा याची वाटणी खालील प्रमाणे करावी अशी शिफारस केली आहे.

| अ.नं. | तपशील | एकूण शिल्लक नफा रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | राखीव निधी २५% | ७५,६९,७३१.०० |
| २ | जादा राखीव निधी (ॲडिशनल फंड) १०% | २२,७०,९१९.०० |
| ३ | लाभांश (डिव्हिडंड)<br>अ) प्रेफरेन्शीअल भागावर लाभांश रुपाने व्याज ८% (प्रेफरेन्शीअल सभासद)<br>ब) लाभांश (डिव्हिडंड) १२% (नियमीत सभासद) | ८८,१८,२०४.००<br>रु. २३,६७४.००<br>रु. ८७,९४,५३०.०० |
| ४ | निवडणूक निधी | ६०,०००.०० |
| ५ | सभासद कल्याण निधी | ११,००,०००.०० |
| ६ | गुंतवणुक चढउतार निधी | ७९,००,०००.०० |
| ७ | इमारत निधी | २५,५०,०००.०० |
| | **एकूण नफा वाटणी** | **३,०२,६८,८५४.००** |
| | **शिल्लक नफा पुढील वर्षासाठी** | **१०,०६८.९३** |

कृपया वरील प्रमाणे शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजुरी द्यावी ही संचालक मंडळाच्या वतीने नम्र विनंती.



● मोबाइल बँकिंग इतर कुणाच्याही मोबाइल हँडसेट वर अपडेट करू नका

**गुंतवणूक -**

बँकेकडील उपलब्ध निधीची गुंतवणूक करताना भारतीय रिझर्व बँकेचे मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून त्यानुसार सरकारी रोखे, इतर शेडयूल बँकेत मुदत ठेवी तसेच म्युच्युअल फंड यामध्ये वेळोवेळी गुंतवणूक करण्यात आली आहे. गतवर्षी अशा प्रकारची एकूण गुंतवणूक रुपये १२३,१३,२०,०००/- होती त्यामध्ये अहवाल सालात रक्कम रुपये २२,१८,९३,०००/- ने गुंतवणुकीत वाढ होऊन अहवाल वर्षाखेरीस एकूण गुंतवणूक रुपये १४५,३२,१३,०००/- आहे

अहवाल सालात गुंतवणुकीवर मिळालेले व्याज एकूण रुपये ३,५८,८४,०००/- असून गतवर्षी ते ३,३६,६९,०००/- होते त्यामध्ये रु २२,१५,०००/- ने वाढ झाली आहे. याशिवाय सरकारी रोख्यांच्या गुंतवणुकीची खरेदी व विक्री अहवाल वर्षात करून वर्षाखेरीस बँकेने रुपये ४३,३५,०००/- चा नफा मिळविला आहे. गतवर्षी तो रुपये १७,६९,०००/- होता.त्यामध्ये आर्थिक वर्षात रुपये २५,६६,०००/- ची भरीव वाढ झाली आहे. याशिवाय बँकेने भारतीय रिझर्व बँकेचे मार्गदर्शक तत्त्वानुसार इंटर बँक डिपॉझिट ची ५% टक्के प्रमाणे सिंगल बँक व एकूण गुंतवणुकी चे २०% एक्सपोजर प्रमाण चे पालन केले आहे.

**महत्तम कर्जमर्यादा (Loan Exposure Limit) -**

नागरी सहकारी बँकांनी एका सभासद कर्जदारास महत्तम म्हणजे जास्तीत जास्त वैयक्तिक (Individual) व ग्रुप (Group) कर्ज मर्यादा मजूंर करण्याबाबतचे निकष व निर्देश दिलेले आहे. सदरची मर्यादा ही अहवाल वर्षात फक्त टायर १ च्या स्वभांडवलावर १५% व २५% अनुक्रमे नव्याने निश्चित करण्याबाबत मा. रिझर्व्ह बँकेने निर्देश दिले आहेत.

यापूर्वी टायर १ व टायर २ च्या एकूण स्वभांडवलावर १५% व ४०% महत्तम कर्ज मर्यादा होती.

| | स्वभांडवल प्रकार | दि. ३१/०३/२०२० अखेरचे स्वभांडवलवर आधारित | |
|---|---|---|---|
| १ | टायर १ रु. | रु. २४ कोटी ४७ लाख ४६ हजार . | |
| २ | मा. रिझर्व्ह बँक महत्तम कर्जमर्यादा | वैयक्तिकसाठी | ग्रुपसाठी |
| | अ.नं. १ च्या | १५% | २५% |
| ३ | आपल्या बँकेची महत्तम मंजूर कर्जमर्यादा रु. | रु. ३ कोटी ६७ लाख १२ हजार | रु. ६ कोटी ११ लाख ८७ हजार |
| ४ | संचालक मंडळाने निश्चित केलेली मंजूर मर्यादा | ३ कोटी ६० लाख | ६ कोटी |
| ५ | मंजूर मर्यादा कालावधी | ०१/०४/२०२० ते ३१/०३/२०२१ | ०१/०४/२०२० ते ३१/०३/२०२१ |

सन २०२०-२१ ची नफावाटणी मंजूर झाल्यानंतर वरील महत्तम कर्ज मर्यादेमध्ये दि.०१/१०/२०२१ पासून वाढ होईल व त्याप्रमाणे नविन महत्तम कर्ज मर्यादा संचालक मंडळ मंजूर करेल.सभासदांनी विशेषत: लहान व मध्यम उद्योगांनी व लघुउद्योगांनी आपल्या बँकेचा कमी झालेला कर्ज व्याजदर व सदर महत्तम मर्यादा याचा अवश्य फायदा व लाभ घेऊन स्वत:ची व बँकेची प्रगती साध्य करावी अशी विनंती करतो.



मोबाईल हँडसेट बदल झाल्यास त्वरित बँकेला कळवावे त्या शिवाय आपले मोबाईल बँकिंग सुरू होणार नाही

**कर्जे -**

मागील आर्थिक वर्षाचे तुलनेत एकूण कर्जामध्ये रुपये २५,१९,९८,०००/- ने भरीव वाढ झाली आहे ३१ मार्च २०२१ अखेरीस एकूण कर्ज वाटप रुपये २३५,५९,९४,०००/- इतकी असून एकूण कर्जाचे ठेवीशी प्रमाण ६६.३६% आहे.गत वर्षी हे प्रमाण ६४.०२% होते. सदरचे प्रमाण ७० % पर्यत वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असून आपल्या बँकेने कर्जावरील व्याजदर आर्थिक वर्षात दोन वेळा बदलून तसेच रिबेट मध्ये वाढ करून इतर सहकारी व व्यापारी तसेच खाजगी बँकांच्या कर्ज व्याज दराच्या तुलनेत अतिशय स्पर्धात्मक कर्ज व्याजदर निश्चित केलेले आहेत. तसेच कर्ज मंजुरीची व वितरण प्रक्रिया जलद व ग्राहकाभिमुख करण्यासाठी संचालक मंडळाने प्रयत्न केले आहेत व करीत आहे.

कर्ज मंजूर करताना व्यापारी, लघुउद्योग, वैद्यकीय व इतर सेवा उद्योग तसेच सोने तारण कर्ज, गृहकर्ज, वाहन कर्ज इत्यादी लहान व मध्यम कर्जदार हा केंद्रबिंदू मानला आहे. याचा फायदा सर्व सभासदांनी अवश्य घ्यावा तसेच आपल्या परिचित व्यक्ती, मित्र ,नातेवाईक यांनाही अवगत करावे व आपल्या बँकेकडील कमी केलेल्या कर्ज व्याजदराचा फायदा घेण्यासाठी त्यांनासुध्दा प्रोत्साहित करावे व आपल्या नजीकच्या कोणत्याही शाखेत संपर्क करावा असे विनम्र आवाहन बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने आपणास करीत आहे.

**अग्रक्रम व दुर्बल घटक कर्जे -**

बँकेने अग्रक्रम क्षेत्रासाठी ५२.१९% व दुर्बल घटकांसाठी १७.७२% कर्जपुरवठा करुन मा रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक ४०% व १०% कर्जपुरवठा सुचनेचे पालन केले आहे.

**एनपीए -निष्क्रिय कर्ज मालमत्ता -**

२५ मार्च २० पासून सुरू झालेल्या कोरोना महाभयंकर महामारी चा काळ हा आर्थिक वर्ष २० -२१ मध्ये ऑगस्ट २० पर्यत सतत राहिला. या सहा महिन्याच्या कोरोना काळात देशभरातील सर्व व्यापार उद्योग व व्यवसाय बंद राहिले होते व संपूर्ण अर्थ चक्रच थंडावले होते. त्याचा विपरीत परिणाम बँकेचा ग्रॉस व नेट एन पी ए रक्कम वाढीमध्ये झाला. मा. रिझर्व बँकेने व केंद्र सरकारने या अचानक उद्भवलेल्या कोरोना संकटातून कर्जदार सभासदांना व बँकांना मदत करून अर्थ प्रवाह हळू हळू पूर्वपदावर आणण्यासाठी सहा मासिक हप्ते किंवा व्याज भरण्यास सवलत देऊन मोरॅटोरीयम रूपाने मुदतवाढ दिली आहे. तसेच या काळातील कर्जावर दरमहा व्याजावर व्याज अशी आकारणी म्हणजेच इंटरेस्ट ऑन इंटरेस्ट रक्कम पात्र कर्जदार सभासदाच्या कर्ज खाती अनुदान रूपाने जमा करून चक्रवाढ व्याजाचा त्यांचे वरील बोजा कमी व हलकासा करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे सन२०-२१ आर्थिक वर्षात अनपेक्षितपणे वाढणारी एनपीए खाती व रक्कम काही प्रमाणात व नियंत्रणात ठेवण्यास आपल्या बँकेला निश्चितच यश प्राप्त झाले आहे. त्यामुळे ग्रॉस एनपीए प्रमाण ७% पेक्षा कमी व नेट एनपीए प्रमाण ३% पेक्षा कमी ठेवणे शक्य झाले त्याची माहिती खालील प्रमाणे -

३१ मार्च २१ अखेरीस बँकेची एनपीए आकडेवारी व मोरॅटोरीयम विषयक सांख्यिय माहिती खालील प्रमाणे

| अ.नं. | तपशील | दि. ३१-०३-२०२० | दि. ३१-०३-२०२१ |
|---|---|---|---|
| १. | एकूण कर्ज | २१०,३९,९६,००० | २३५,५९,९४,००० |
| २. | ग्रॉस एनपीए | १०,३४,८५,००० | १४,७६,४२,००० |
| ३. | ग्रॉस एनपीए प्रमाण | ४.९२% | ६.२७% |
| ४. | नेट एनपीए प्रमाण | १.६९% | ३.००% |



आपला Birth date व पॅन नंबर बँकेत अद्यावत करावे -मोबाईल बँकिंग पासवर्ड reset करण्यासाठी या बाबींची गरज लागते.

सन २० -२१ मध्ये व कोरोना संकट काळात आपल्या बँकेचे ५ ते ६ उद्योग व उद्योजक यांच्यावर विपरीत परिणाम झाल्यामुळे गत वर्षाची एकूण ग्रॉस एनपीए रक्कम रुपये.१०कोटी ३४ लाख ८५ हजार मध्ये अचानक पणे व अनपेक्षित रुपये ४ कोटी ४१ लाख ५७ हजार ची वाढ होऊन आर्थिक वर्षाखेरीस सदर एकूण ग्रॉस एनपीए रक्कम रुपये १४ कोटी ७६ लाख ४२ हजार झाली. त्यामुळे गत वर्षाचे ग्रॉस एनपीए चे प्रमाण यामध्ये १.३५% ची वाढ होऊन आर्थिक वर्षाखेरीस ६.२७% झाले आहे. माझी सर्व सभासद कर्जदारांना नम्र विनंती की त्यांनी सदर कोरोना काळातील एनपीए झालेली त्यांची कर्ज खाती स्टँडर्ड करून वाढलेली एन पी ए रक्कम कमी करण्यासाठी बँकेस सहकार्य करावे व मदत करावी ही आग्रहाची विनंती व पुढील कटू कारवाई टाळावी.

बँकेचा ग्रॉस एनपीए ७% च्या पुढे गेल्यास मा. रिझर्व बँकेच्या पूर्व परवानगी शिवाय डिव्हिडंड वाटप सभासदांना करता येत नाही. परंतु सुदैवाने आपण कोरोना च्या या महामारीतसुद्धा ७%च्या आत ग्रॉस एनपीए ठेवण्यात यशस्वी झालो त्यामुळेच आज आपल्या मंजुरीने लाभांश म्हणजेच डिव्हिडंड १२ टक्के देण्याची शिफारस केली आहे. सभासदांनी आज पावेतो जे सहकार्य केले व जिल्ह्यामध्ये आपल्या बँकेची ग्रॉस एनपीए ५ % च्या आत ठेवण्याची जी परंपरा होती ती पुढील वर्षी साध्य करण्यास सहकार्य करावे. तसेच रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार संपूर्णथकित हप्ते व व्याज भरून आपली कर्जे स्टँडर्ड करून बँकेचा आर्थिक सुदृढ पाया अधिक सुदृढ करावा ही विनंती याप्रसंगी करतो.

बँकेची आर्थिक प्रकृती कोरोना काळात सुद्धा सुदृढ व उत्तम ठेवण्यासाठी थकबाकी उपसमितीचे चेअरमन श्री दिलीपकुमार पारख व त्यांचे सर्व समिती संचालक व शाखाधिकारी यांनी जे अथक श्रम कोरोना काळात केले व बँकेची आर्थिक प्रकृती निरोगी व निकोप ठेवली त्याबद्दल सर्वांना धन्यवाद देतो व ऋण व्यक्त करतो. प्रत्येक कर्ज खात्याच्या बाबतीत वसुली उपसमितीच्या देखरेखेखाली सातत्याने आर्थिक वर्षात खूप प्रयत्न समिती चेअरमन व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले, वेळप्रसंगी एनपीए खातेदारांना समक्ष चर्चेसाठी बँकेत बोलावून त्यांच्या अडचणी समजावून घेतल्या. तरीसुद्धा ५ ते६ मोठ्या एनपीए कर्जदारांना थकीत हप्ते व व्याज भरण्याची संधी देऊन देखील त्यांनी थकबाकी रक्कम भरली नाही त्यामुळे ग्रॉस एन पी ए रक्कम व प्रमाण वाढले आहे. बँकेस नाईलाजास्तव पुढील कायदेशीर कारवाई करणे भाग पडत आहे तरी कृपया एनपीए कर्जदार सभासदांनी कायदेशीर कारवाई चा कटू प्रसंग टाळण्यासाठी व बँकेच्या कर्ज वसुलीस सकारात्मक प्रतिसाद देऊन बँकेस सहकार्य करावे ही पुनश्च नम्र विनंती करतो.

### संचालक व त्यांचे नातेवाईकांना दिलेली कर्जे (म.स.सं.अधिनियम १९६० चे कलम ७५(२)मधील तरतुदीनुसार)

(रक्कम रुपये)

| अ.नं. | तपशील | वर्षाच्या सुरुवातीस येणे कर्ज रक्कम | आर्थिक वर्षात देऊ केलेली कर्ज रक्कम | आर्थिक वर्षात फेड केलेली कर्ज रक्कम | आर्थिक वर्ष अखेरीस येणे कर्ज रक्कम | येणे कर्ज रकमेपैकी थकित असल्यास रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | मा. संचालकांची वैयक्तिक कर्जे | . | . | . | . | |
| | १) इतर कर्जे | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| | २) डिपॉझिट कर्जे | ८४,११,२४२.६५ | 0.00 | ७७,६३९.७० | ९८,१६,५८२.५५ | 0.00 |
| | **एकूण (अ)** | ८४,११,२४२.६५ | 0.00 | ७७,६३९.७० | ९८,१६,५८२.५५ | 0.00 |
| २) | मा. संचालकांची फर्म व नातेवाईकांना दिलेली कर्जे | | . | | | |
| | १) इतर कर्जे | १,४४,४१७.०० | 0.00 | १,४४,४१७.०० | 0.00 | 0.00 |
| | २) डिपॉझिट कर्जे | ५,३६,३६,४४८.२५ | २२,६३,०००.०० | ५,५६,१४,०१६.६५ | २,८५,४३१.६० | 0.00 |
| | **एकूण (ब)** | **५,३७,८०,८६५.२५** | **२२,६३,०००.००** | **५,५७,५८,४३३.६५** | **२,८५,४३१.६०** | 0.00 |
| | **एकूण (अ+ब)** | **६,२१,९२,१०७.९०** | **२२,६३,०००.००** | **५,५८,३६,०७३.३५** | **१,०१,०२,०१४.१५** | 0.00 |

अहवाल वर्षाअखेरीस ठेवतारण कर्जा व्यतिरिक्त बँकेच्या कोणत्याही संचालकांकडे कोणत्याही प्रकारचे कर्ज नाही ही स्वागतार्ह बाब आहे.



● मोबाईल बँकिंग user id व password कुणालाही देऊ नये

**मा.रिझर्व बँक तपासणी -**

बँकेच्या ३१ मार्च २० अखेरच्या आर्थिक स्थितीवर आधारित भारतीय रिझर्व बँकेने आपल्या बँकेची १.४.२०१८ ते ३१.३.२० अखेरची ऑनलाइन पद्धतीने तपासणी (कोरोनाविषाणू संसर्गामुळे) पूर्ण केली आहे. सदरचा तपासणी अहवाल अद्याप आलेला नाही, अहवाल प्राप्त झाल्यावर त्यातील दोषांची दोष दुरुस्ती व अहवाल पूर्तता निर्धारित मुदतीत करून पाठविण्यात येईल. मा. रिझर्व बँकेच्या तपासणी अधिकाऱ्यांनी ऑनलाइन तपासणी केल्याबद्दल व बँकेस मार्गदर्शन केल्याबद्दल धन्यवाद व आभार.

**मा. वैधानिक लेखापरीक्षण**

आर्थिक वर्ष २० -२१ चे वैधानिक लेखापरीक्षण मे व्ही. एच. जाजू अँड कंपनी, नाशिक यांनी पूर्ण केले असून बँकेस कॅमल रेटिंग चे निकषानुसार अ ऑडिट वर्ग दिला आहे. बँकेने सतत '**अ**' ऑडिट वर्गाची परंपरा कायम ठेवली आहे. सदरचा लेखापरीक्षण अहवाल सभेपुढे ठेवला आहे त्याची नोंद घेऊन स्वीकृत करावा ही विनंती व शिफारस आहे. तसेच मागील आर्थिक वर्ष १९- २० च्या वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालातील दोषांची दोष दुरुस्ती करून त्यातील निर्देशित केलेल्या त्रुटींचा व दोषांचा दोष दुरुस्ती अहवाल सभेपुढे माहितीसाठी ठेवला आहे. त्याची नोंद घेऊन कृपया मान्यता द्यावी ही विनंती.

सन२०- २१ चे वैधानिक लेखापरीक्षण करताना सी ए श्री. विनोद जाजू, नाशिक यांनी बँकेस वेळोवेळी जे बहुमुल्य मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांचे बँकेतर्फे आभार व्यक्त करतो.

**मा. समवर्ती लेखापरिक्षण व वार्षिक स्टॉक तपासणी**

आर्थिक वर्ष २०-२१करिता ८ शाखा व १ प्रधान कार्यालयासाठी खालील नमूद सीए व त्यांचे फर्म कडून मासिक/त्रैमासिक समवर्ती लेखापरीक्षण केलेले आहे तसेच रु ५० लाख व त्यापेक्षा जास्त हायपोथिकेशन कर्ज मर्यादा ज्या कर्जदारांना मालाचे तारणावर मंजूर केली आहे. त्याच्या मालाची वार्षिक स्टॉक तपासणी, ऑडिट चे काम संबधीत सीए फर्म मार्फत पूर्ण केले आहे .त्यांनी वेळोवेळी मौलिक सूचना बँकेस करून उत्तम मार्गदर्शन व सहकार्य केल्याबद्दल सर्वाचे आभार.

| शाखा व नंबर | | कंकरंट ऑडिटरचे नांव | स्टॉक ऑडिटरचे नांव |
|---|---|---|---|
| हेड ऑफिस | | मे. जितेंद्र के. लाहोटी ॲण्ड असोसिएटस् | |
| मुख्य शाखा | १ | मे. एसपीएमएल ॲण्ड कंपनी | मे. जितेंद्र के. लाहोटी ॲण्ड असोसिएटस् |
| | | | मे. सागर भळगट ॲण्ड कंपनी |
| | | | मे. आर.एस. मणियार ॲण्ड कंपनी |
| | | | मे. मणियार संत ॲण्ड कंपनी |
| | | | मे. ए.ए. पिंपळवाडकर ॲण्ड असोसिएटस् |
| अकोले शाखा | २ | मे. सागर भळगट ॲण्ड कंपनी | मे. ए.ए. पिंपळवाडकर ॲण्ड असोसिएटस् |
| बाजारपेठ शाखा | ३ | मे. आर.एस. मणियार ॲण्ड कंपनी | मे. व्हीएसएपी ॲण्ड कंपनी |
| | | | मे. राठी एस.के. ॲण्ड कंपनी |
| सिन्नर शाखा | ४ | मे. मणियार संत ॲण्ड कंपनी | लागु नाही |
| राहाता शाखा | ५ | मे. ए.ए. पिंपळवाडकर ॲण्ड असोसिएटस् | मे. राठी एस. के. ॲण्ड कंपनी |
| आळे शाखा | ६ | मे. राठी एस. के. ॲण्ड कंपनी | लागु नाही |
| घुलेवाडी शाखा | ७ | मे. सागर भळगट ॲण्ड कंपनी | मे. राठी एस.के ॲण्ड कंपनी |
| चाकण शाखा | ८ | मे. व्हीएसएपी ॲण्ड कंपनी | मे. आर.एस. मणियार ॲण्ड कंपनी |



आपला मोबाईल हँडसेट १० मिनिट पेक्षा जास्त वेळ कुणाच्याही हातात देऊ नये

बँकेच्या ऑडिट उपसमितीचे चेअरमन व तज्ञ संचालक सीए श्री. संजय राठी व ऑडिट उपसमितीच्या सर्व संचालक सदस्यांनी वेळोवेळी वरील सर्व लेखापरीक्षण अहवालाबाबत, बँकेचे सीईओ यांच्या आधिपत्याखाली सातत्याने नियंत्रण ठेवले व त्यातील दोषांची दुरुस्ती करून उत्तम बँकिंग व्यवहार करण्यासाठी संचालक मंडळास मदत व सहकार्य केले तसेच आपल्या बँकेचे आर्थिक आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानतो व धन्यवाद देतो.

**सन २१-२२ साठी वैधानिक लेखापरीक्षक नेमणूक व मुख्य कार्यकारी अधिकारी नेमणूक**

भारतीय रिझर्व बँकेने सर्व नागरी बँकांना सन २१-२२ पासून वैधानिक लेखापरीक्षक नेमणूक बाबत नुकतेच एक परिपत्रक काढून व निर्देश देऊन अशा वैधानिक लेखापरीक्षकाची २१ -२२ साला पासुन नेमणूक करण्यापूर्वी संचालक मंडळास ठराव करून व प्रस्ताव तयार करून त्याबाबत मा. रिझर्व बँकेची पूर्वपरवानगी घेऊन नेमणूक करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे बँकेच्या संचालक मंडळाने सन २१ -२२ साला साठी वैधानिक लेखापरीक्षक नेमणूक बाबत प्रस्ताव तयार करून मा.रिझर्व बँकेकडे मान्यतेसाठी सादर केला आहे त्यांचे मंजुरीस अधीन राहून आपण वैधानिक लेखापरीक्षक नेमणुकीस मंजुरी द्यावी अशी विनंती करतो.

तसेच बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर नव्याने नेमणूक करण्यापूर्वी मा.रिझर्व बँकेने कळविलेल्या परिपत्रकातील निकष व शैक्षणिक पात्रतेच्या अटी बाबत नागरी सहकारी बँकांना पालन करण्याचे निर्देश नुकतेच दिले आहेत व अशा नेमणुकीस रिझर्व बँकेची परवानगी घेण्याचे बंधन टाकले आहे.

सदर परिपत्रकानुसार आपल्या बँकेने नुकतेच नवीन सिइओ श्री. गोपाल अनिरुद्ध गांगल यांची १२.७.२०२१ पासून नेमणूक करून त्यांचा प्रस्ताव मंजुरीसाठी मा.रिझर्व बँकेकडे सादर केला आहे.

आर्थिक वर्षात बँकेचे सिइओ श्री. सुरम साहेब यांनी कामकाज पाहिले व बँकेस मार्गदर्शन करून सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करतो. तसेच त्यांनी दिनांक १६.६.२०२१ पासून सिइओ पदाचा स्वेच्छेने राजीनामा देऊन बँक सेवेतून स्वेच्छानिवृत्ती घेतली आहे. त्यांचे रिक्त सिइओ पदावर दि.१२.७.२१ पासून श्री. गांगल साहेब यांची नव्याने नेमणूक संचालक मंडळाने केली आहे. तसेच डेप्युटी सिइओ म्हणून श्री. संजय बागडेसाहेब यांची नुकतीच नेमणूक केली आहे. येणाऱ्या स्पर्धात्मक बँकिंग युगात उच्च अधिकारी वर्गाची लागणारी आवश्यकता समजून बँकेने नेमणूक करून व भविष्यकालीन बँक विकासाचे धोरण अवलंबिले आहे.

**पुरस्कार व गौरव -**

गतवर्षी सन १९-२० मध्ये आपल्या बँकेने ग्रॉस एनपीए ५%पेक्षा कमी ठेवल्यामुळे अहमदनगर जिल्हा नागरी सहकारी बँकस् असोसिएशनचा **उत्कृष्ट एनपीए व्यवस्थापन पुरस्कार** आर्थिक वर्षात बँकेस प्राप्त झाला आहे. गत ५ वर्षापासून आपल्या बँकेस सदर पुरस्काराने सतत गौरविण्यात आले आहे. थकबाकी वसुली समितीचे चेअरमन श्री.दिलीपकुमार पारख व त्यांचे समिती सदस्यांचे अभिनंदन !

**मानव संसाधन विकास -**

सध्या बँकिंग क्षेत्रात फार मोठी स्पर्धा सुरू आहे तंत्रज्ञानाचा वापर सातत्याने वाढतो आहे. बँक कामकाजाच्या पद्धतीत सतत बदल होत आहेत व ग्राहकांच्या वाढत्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी दैनंदिन कामकाजात व्यावसायिकता आणणे आवश्यक झाले आहे. आर्थिक वर्षात बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी बँकेची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी समर्पित भावनेने दिलेल्या योगदानाबद्दल तसेच उत्कृष्ट ग्राहक सेवा प्रदान केल्याबद्दल संचालक मंडळाचे वतीने कृतज्ञता व्यक्त करतो व भविष्यकाळातही दिलेली उद्दिष्टे पूर्ण करून व अधिकाधिक बँक प्रगती पथावर नेण्यासाठी निश्चित प्रयत्न करतील अशी अपेक्षा व्यक्त करतो. आर्थिक वर्षाअखेरीस बँकेत एकूण ८१ सेवक वृंद काम करीत आहेत. कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन व स्पर्धात्मक परीक्षा पास होणाऱ्या पात्र अधिकारी व कर्मचाऱ्यांना बँक संचालक मंडळाने प्रमोशन देण्याचे धोरण स्वीकारले आहे.बँक प्रगतीत सर्व सेवकांचे योगदान आहे त्याबद्दल आभार व्यक्त करतो.



अधिक सुरक्षिततेसाठी व आपण भारतीय असल्यामुळे भारतीय बनावटीचे RUPAY ATM कार्डच वापरावे.

**बोर्ड ऑफ मॅनेजमेंट**

मागील ५५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये आपल्या बँकेने मा. रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या निर्देशानुसार बोर्ड ऑफ मॅनेजमेंट बाबत पोटनियम दुरुस्ती मंजूर केली व त्यास मा. सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांची मंजुरी प्राप्त झाली आहे. त्याप्रमाणे बँकेने नव्याने बोर्ड ऑफ मॅनेजमेंट ची समिती स्थापन करून सदर समितीमध्ये विद्यमान संचालक मंडळातून ३ संचालकांची व बाहेरील २ व्यक्ती अशा एकूण ५ सदस्यांची बोर्ड ऑफ मॅनेजमेंट म्हणून समिती गठित करण्यात आली आहे व सदर समिती प्रस्ताव मा. रिझर्व बँक, नागपूर येथे मंजुरीसाठी पाठविण्यात आलेला आहे. परंतु अद्यापपावेतो रिझर्व बँकेकडून सदर समिती स्थापनेस मंजुरी प्राप्त झालेली नाही. सदर समितीमध्ये खालील प्रमाणे ५ सदस्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

| संचालकांतून | बाहेरील व्यक्तींमधून |
|---|---|
| श्री. राजेश ओंकारनाथ मालपाणी | सी.ए. श्री. नारायण जगन्नाथ कलंत्री |
| सी.ए. श्री. संजय शंकरलाल राठी | सी.ए. श्री. योगेश बद्रीनारायण झंवर |
| श्री. ओंकार राजेंद्रप्रसाद सोमाणी | |

**संचालक मंडळ सभा व उपसमित्या सभा -**

अहवालसालात चेअरमन म्हणून मला व्हाईस चेअरमन श्री.संतोष करवा ,सर्व सहकारी संचालक व सर्व उपसमित्यांचे चेअरमन व सदस्य यांनी वेळोवेळी आर्थिक व अमूल्य सहकार्य,मदत व मार्गदर्शन केले त्याबद्दल त्या सर्वांचे ऋण व्यक्त करतो.

अहवाल सालात संचालक मंडळाच्या एकूण १९ सभा,कर्ज उपसमिती ८सभा,थकबाकी उपसमिती ६सभा,परचेस उपसमिती ८सभा,स्टाफ उपसमिती ६सभा,ऑडिट उपसमिती ५सभा,गुंतवणुक उपसमिती ४ सभा व संगणक उपसमिती २ सभा घेऊन आर्थिक वर्षात कोरोना संकटाचे पालन करुन सभा घेऊन निर्णय घेतले त्याबद्दल सर्वांचे आभार!

**बँकेचा महत्वाकांक्षी सोलर वीज प्रकल्प -**

आपल्या बँकेने मुख्यशाखा व प्रधान कार्यालय,संगमनेर ,अकोलेशाखा व चाकणशाखा येथे स्वत:ची सोलर सिस्टिम कार्यान्वित करुन सोलर वीज निर्मिती करुन त्याचा वापर शाखास्तरावर सुरु केला आहे.भविष्यकालीन वाढत्या वीज बिल खर्चाची त्यामुळे बचत होऊन व बँकेला येणाऱ्या दरमहाच्या एमएसईबी च्या वीज बिल खर्चात खूप खूप बचत झाली. त्यामुळे बँकेस सोलर वीज उत्पन्न आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये एकूण रु.१३,६३,२६१/- मिळाले आहे.गतवर्षी सदरचे सोलर वीज उत्पन्न (२०१९-२०) रु.९,९५,६२३/- होते.त्यामुळे चालू अहवाल वर्षात बँकेस गतवर्षापेक्षा रु.३ लाख ६७ हजार ५३८ चे जादा सोलर वीज उत्पन्न प्राप्त झाले आहे. सदरची संकल्पना चेअरमन म्हणून माझी असली तरी सर्व संचालकांच्या सहकार्यामुळे आपल्या बँकेस भविष्यात सोलर उत्पन्न व वीज खर्च बचत रुपाने इतर उत्पन्नाचे साधन निरंतर निर्माण झाले आहे. सदरचा प्रकल्प कार्यान्वित करणारी व भविष्यात सर्व शाखा सोलर वीजवर चालवणारी आपली संगमनेर मर्चंट बँक कदाचित महाराष्ट्रात एकमेव असेल. सदर सोलर वीज प्रकल्पाची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे

| अ.नं. | सोलर प्रकल्प शाखा | सोलर प्रकल्प क्षमता | सोलर वीज निर्मिती युनिट संख्या | सोलर वीज प्रकल्पामुळे बँकेची झालेली एकूण वीज बिल खर्चात बचत रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | मुख्य शाखा व प्रधान कार्यालय, संगमनेर | ४८ किलो वॅट | ६०,९९७ | ११,१०,७४६ |
| २. | अकोले शाखा | ९ किलो वॅट | ११,४७५ | ९९,०२४ |
| ३. | चाकण शाखा | ११ किलो वॅट | १३,९०१ | १,५३,४९१ |
| | **एकूण रुपये** | | **८६,३७३** | **१३,६३,२६१** |



Smepay ॲप मध्ये तात्पुरते एटीएम कार्ड ऑन / ऑफ करण्याची सुविधा.

**ऋणनिर्देश व आभार -**

आपल्या बँकेला प्रगतीपथावर ठेवण्यासाठी सतत हातभार लावलेल्या व सहकार्य केलेल्या सर्व निष्ठावान सभासदांचा मी अत्यंत आभारी आहे व असेच सहकार्य पुढील काळात सुध्दा निश्चित मिळेल हीअपेक्षा !

बँकेवर दाखविलेला विश्वास व सर्वांगीण प्रगतीसाठी व पाठिंबा देणाऱ्या भागधारकांचा मी ऋणी आहे.तसेच माझे सर्व सहकारी संचालक यांनी सुध्दा मला कामकाज करतांना जे मौलिक विचार मांडून उत्तमोत्तम कार्य पूर्ण करण्यासाठी वेळोवेळी जे सहकार्य केले त्याबद्दल मन:पूर्वक आभार.

- **बँक पदाधिकारी , उपसमिती चेअरमन व शाखापालक संचालक :-** बँकेची प्रगती व विकास साध्य करण्यासाठी व्हा.चेअरमन श्री.संतोष  करवा,माझे सर्व सहकारी संचालक,तज्ञ संचालक सीए श्री.संजय राठी व श्री.ओंकार बिहाणी ,कर्ज उपसमिती चेअरमन श्री. प्रकाश राठी,थकबाकी उपसमिती चेअरमन श्री.दिलीपकुमार पारख,गुंतवणूक उपसमिती चेअरमन श्री.ओंकार सोमाणी,ऑडिट उपसमिती चेअरमन सीए श्री.संजय राठी, परचेस उपसमिती चेअरमन श्री.राजेंद्र वाकचौरे, आयटी(संगणक) उपसमिती चेअरमन श्री.सतिष लाहोटी,स्टाफ उपसमिती चेअरमन श्री.सुनिल दिवेकर यांनी व सर्व शाखांचे पालक संचालक श्री.श्रीगोपाल पडतानी(मुख्यशाखा),श्री.दिलीपकुमार पारख (अकोलेशाखा),श्री.ओंकार सोमाणी (बाजारपेठशाखा) ,श्री.प्रकाश राठी (सिन्नरशाखा),श्री.राजेंद्र वाकचौरे(राहाताशाखा),श्री.सतिष लाहोटी (आळेफाटाशाखा), सौ. ज्योती पलोड (घुलेवाडीशाखा) व श्री.गुरुनाथ बाप्ते (चाकणशाखा) तसेच माझे सहकारी संचालक डॉ.श्री.संजय मेहता, श्री.ज्ञानेश्वर कर्पे, श्री.राजेश करवा,श्री.संदिप जाजू,श्री.प्रकाश कलंत्री ,डॉ.सौ.अर्चना माळी तसेच सेवक प्रतिनिधी श्री.तुकाराम सांगळे व श्री.राहुल जगताप यांनी सुध्दा बँकेची अहवालसालातील उत्तम प्रगती साध्य करण्यासाठी संचालक मंडळ व उपसमिती सभेत मला साथ दिली व सहकार्य केले त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार व ऋण व्यक्त करतो.
- **रिझर्व्ह बँक, सहकार खाते,असोसिएशन व फेडरेशन:-** मा.रिझर्व्ह बँकेतील (नागपूर विभाग) अर्बन बँक विभागातील सर्व उच्चपदस्थ अधिकारी,मा.सहकार मंत्री महोदय,मा.सहकार आयुक्त व निबंधक साहेब ,पुणे व त्यांचे सर्व सहकारी अधिकारी,मा.विभागीय सहनिबंधक साहेब,(प्रशासन) व (ऑडीट)नाशिक , मा.जिल्हा उपनिबंधक साहेब व मा.जिल्हा विशेष लेखा परीक्षक साहेब, अ.नगर व त्यांचे सर्व सहकारी अधिकारी, मा.उपनिबंधक साहेब, संगमनेर, महाराष्ट्र अर्बन बँक्स फेडरेशन व असोसिएशन,मुंबई,अहमदनगर ,नाशिक व पुणे जिल्हा अर्बन बँक असोसिएशन चे अध्यक्ष , सेक्रेटरी व परसेवेतील मा.उपनिबंधक साहेब, यांनी वेळोवेळी बँकेस केलेल्या मार्गदर्शनाबद्दल बँक त्यांची सदैव ऋणी आहे.
- नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI), सॉफ्टवेअर व्हेन्डॉर ॲक्युट कंपनी,अहमदाबाद तसेच  स्टेटबँक व अन्य सर्व राष्ट्रीयकृत बँक ,एचडीएफसी बँक,आरबीएल बँक,ए यु.स्मॉल बँक, ॲक्सीस बँक ,कोटक महिंद्रा बँक,बंधन बँक ,इक्वीटास बँक,सर्व सहकारी शेड्युल बँका राज्य सहकारी बँक,जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांचे वेळोवेळी मिळालेल्या सहकार्याबद्दल आभार. अहवाल सालात संगमनेरचे आमदार मा.बाळासाहेब थोरात व डॉ.सुधीर तांबे ,संगमनेर नगरपालिकेचे मा.अध्यक्ष , मा.उपाध्यक्ष,सर्व नगरसेवक ,मुख्य अधिकारी व नगरपालिकेचे अधिकारी व सेवक वर्ग ,बँकेचे सरकारी ऑडिटर सीए श्री.व्ही.एच.जाजू व त्यांचे सहकारी यांचे वेळेवेळी मिळालेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करतो.
- **कंकरंट ऑडीटर व पॅनल ॲडव्होकेट:-** कंकरंट ऑडिटर सीए श्री.जितेंद्र लाहोटी,  सीए श्री. सुमीत राठी, सीए श्री. सागर भळगट, सीए श्री. रविश मणियार, सीए श्री. अमित कासट, सीए श्री. अंकितकुमार मणियार व सीए. श्री. अमोल संत, सीए श्री. अभिमन्यु पिंपळवाडकर, सीए. श्री. सचिन मालपाणी तसेच बँकेचे पॅनलवरील विधीतज्ञ ॲड. श्री. प्रदीप मालपाणी,



Cyber Crime झाल्यास त्वरीत बँकेस कळवावे व नजीकच्या Cyber Crime cell (पोलिस स्टेशन) मध्ये तक्रार नोंदवावी.

ॲड. श्री. राजेश भुतडा, ॲड श्री. नितीन जोर्वेकर, ॲड. श्री. गौरव मालपाणी, ॲड. श्री. श्रीकांत गोंगे, ॲड. श्री. श्री.विवेक बोऱ्हाडे, ॲड. श्री. आनंद गांधी, संगमनेर, ॲड. श्री. बाळासाहेब वैद्य (अकोले), ॲड.श्री. श्रीपाद जोशी (सिन्नर), ॲड. भाग्यश्री शिंदे-नलवडे, (आळेशाखा), ॲड.श्री. अतुल घुमटकर (चाकण), ॲड. श्री. गजेंद्र गडकर, (पुणे), ॲड. मोनाली कर्पे तसेच हायकोर्ट ॲड. श्री. अनिल बजाज, ॲड. श्री. रामेश्वर तोतला व ॲड. श्री. राहुल तोतला ,ॲड. श्री. अदित्य सिकची, औरंगाबाद, तसेच ॲड श्री. अनुप लाहोटी, मुंबई / संगमनेर या सर्वांनी केलेल्या उपयुक्त सुचना / मार्गदर्शन व सहकार्याबद्दल त्यांचा अत्यंत आभारी आहे.

- **बँकेचे ५ शाखांचे शाखा सल्लागार :-** श्री.सतिष जयनारायणजी बुब, श्री.रविंद्र दत्तात्रय चोथवे, श्री.तुळशीदास उर्फ रवी धोंडीराम कोटकर, श्री.अनिल शंकरराव कोळपकर, (अकोलेशाखा), श्री.अविनाश केशरलाल डागा, श्री.राहूल गंगाधर चोथवे, श्री.हेमंत नारायण नाईक (सिन्नरशाखा), श्री.प्रविण रमणलाल रुणवाल, श्री.प्रफुल्ल गयाराम पिपाडा, श्री.राजेंद्र शिवलाल भन्साळी, श्री.अरुण गोपाळराव आग्रे (राहाताशाखा), श्री.प्रविण झुंबरलाल लोढा, श्री.सुधीर तान्हाजी लाड, श्री.बबनराव कारभारी लामखडे (आळेफाटाशाखा), श्री.दिलीप बाळासाहेब गोरे, श्री.संदीप मनोहर परदेशी, श्री.महेश श्रीवल्लभ मालपाणी (चाकण शाखा),.

- **प्रॉपर्टी व्हॅल्युअर-** मे.गाडेकर रुद्रभाटे ॲण्ड असोसिएटस्,श्री.बी.आर.चकोर,श्री.दिपक जाजू, श्री.भिमाशंकर अकोलकर, श्री.संजय कटारिया (लोणी/राहाता),श्री.हफिजउद्दीन काझी,श्री.रवी पानसरे असोसिएटस, श्री.समाधान गायकवाड,श्री.योगेश रणमाळे,श्री.अरविंद निघोजकर,डॉ.श्री.किशोर साबळे,संगमनेर तसेच मशिनरी व्हॅल्युअर श्री.प्रशांत गोरले,संगमनेर .

- **गोल्ड व्हॅल्युअर -** श्री.सुरेश मयुर,श्री.प्रसाद मयुर,श्री.सागर डहाळे,(मुख्यशाखा)श्री.संतोष चिंतामणी,श्री.सचिन चिंतामणी (बाजारपेठ व घुलेवाडीशाखा)श्री.गोविंद वर्मा,श्री.दिलीप शाह, श्री.सौरभ शाह,(अकोलेशाखा),श्री.योगेश खोलमकर (सिन्नरशाखा),श्री.प्रितेश नागरे (राहाताशाखा),श्री.पंकज बागडे,श्री.गणेश बेल्हेकर (आळेशाखा),श्री.सुनिल निघोजकर व श्री.गिरीष नगरकर (चाकणशाखा)

- **शाखांचे जागा मालक :-** बँकेने भाडेतत्वावर घेतलेल्या शाखांचे जागा मालक श्री.पुंजीराम शंकर नाईकवाडी,(अकोलेशाखा), सौ.रेणु निखील लाहोटी,(बाजारपेठशाखा),श्रीमती.निलिमा ज्ञानेश्वर कासार,(सिन्नर शाखा), श्री.प्रितेश प्रफुल्ल पिपाडा, (राहाताशाखा), श्री.उमेश भगवंत औटी व श्री.प्रशांत अनंतराव चौगुले, (आळेशाखा), श्रीमती.सत्यभामाबाई काशीनाथ गांडोळे, (घुलेवाडीशाखा) , श्री.संदीप मनोहर परदेशी, (चाकणशाखा) यांचे सहकार्याबद्दल आभार व्यक्त करतो.

- **बँक अधिकारी :-** बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर सुरम तसेच नुकतेच सीईओ पदभार घेतलेले गोपाळ गांगल ,डेप्युटी सीईओ संजय बागडे , असि. जनरल मॅनेजर विजय बजाज व आय.टी.मॅनेजर विठ्ठल कुलकर्णी व ८ शाखांचे शाखाधिकारी यांचे सहकार्याबद्दल आभार.

- श्रीमती. सुवर्णाकाकी मालपाणी यांचे अहवाल शुध्दलेखन तपासणी व अहवाल सुबक व सुंदर करण्यासाठी श्री.प्रविण कुलकर्णी, श्री.सुभाष पवार, श्री. मुरारी देशपांडे यांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार, आर्किटेक्ट श्री.राजेश आर.मालपाणी व त्यांचे सर्व सहकारी व कारपेंटर,अहवाल छपाई सुबकपणे करणारे मे.सिध्दीविनायक प्रिन्टर्स, अहमदनगर यांचे सहकार्याबद्दल आभार. बँकेचे सोलर सिस्टीमसाठी श्री.सागर दुर्गावले यांचे सहकार्याबद्दल आभार तसेच सर्व विमा कंपनीचे अधिकारी वर्ग,बँकेचे सर्व स्टाफ, सहकारी व कंत्राटी कर्मचारी यांना मन:पुर्वक धन्यवाद. जनमानसात बँकेची प्रगती व प्रतिमा मांडणारे व बँकेस प्रसिध्दी देणारे सर्व


पैसे काढतांना इतरांची मदत न घेता केवळ SMBNK security guard ची मदत घ्यावी.

वृत्तपत्रे,वृत्तवाहिन्या व सर्व पत्रकार बंधुंचे आभार व धन्यवाद ! तसेच सर्व ज्ञात - अज्ञातपणे सहकार्य करणाऱ्यांचे आभार.

अहवाल सालात आपल्या बँकेची उत्तम प्रगती करण्यासाठी सर्व सन्माननीय सभासद, ठेवीदार, कर्जदार यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष साथ दिली व सहकार्य केले त्यांचे मन:पूर्वक आभार व ऋण व्यक्त करतो.आपल्या सर्वांच्या सहकार्याने बँकेचा सन २०२०-२१ चा आर्थिक अहवाल आपणासमोर सादर करण्यास मला आनंद होत आहे सर्व सभासदांना विनंती की,ऑनलाइन पध्दतीने विषय पत्रिकेवरील सर्व विषय मंजूर करुन व आपल्या काही सूचना व प्रश्न असतील तर सभेपूर्वी दि.२३/०९/२०२१ पर्यंत लेखी पाठवावे म्हणजे त्याची उत्तरे सभेत ऑनलाइन देता येतील.

**कृतज्ञता -**

आपल्या बँकेच्या आज पर्यतच्या ५६ वर्षाच्या वाटचालीत व प्रगतीत सर्व सभासदांचा खूप मोठा वाटा आहे त्याच बरोबर बँकेचे सर्व संस्थापक, आजी व माजी चेअरमन ,व्हाईस चेअरमन, संचालक व कर्मचाऱ्यांचे योगदान आहे. ठेवीदार व सभासदांचा सक्रिय पाठिंबा व सहभाग बँकेच्या पुढील वाटचालीतही निश्चित मिळत राहील याची मला खात्री व विश्वास आहे.

आपली बँक येणाऱ्या काळात उत्तम प्रगती करून यशाची अनेक शिखरे गाठेल असे आश्वासन संचालक मंडळाच्या वतीने सर्व सभासदांना देऊ इच्छितो व त्यासाठी संचालक मंडळ अविरत प्रयत्नशील आहे. आपणा सर्वाचे पुनश्च संचालक मंडळाच्या वतीने आभार व्यक्त करून आर्थिक वर्ष २०- २१ च्या ५६ व्या वार्षिक अहवालास तसेच सादर केलेल्या प्रमाणित ताळेबंद पत्रक, नफा-तोटा पत्रकास मंजुरी द्यावी व नफा विभागणी, ऑडिटर व सीईओ नेमणूक, अंदाज पत्रक २१- २२ इत्यादी विषय पत्रिकेतील अन्य सर्व विषयांना ऑनलाइन मंजुरी द्यावी अशी विनंती संचालक मंडळाचे वतीने करतो व पूर्णविराम देतो.

**जय सहकार..जय महाराष्ट्र !**

**आपला कृपाभिलाषी**

Rajesh O. Malpani

**(राजेश ओंकारनाथ मालपाणी)**
चेअरमन

ठिकाण :- संगमनेर
दिनांक :-०२/०९/२०२१



मोबाईल नंबर हा DIGITAL व्यवहाराची चावी आहे कृपया आपला मोबाईल नंबर अनोळखी व्यक्तीस देऊ नये,

# दि संगमनेर मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लि.



| तपशील | पान नं. |
|---|---|
| ताळेबंदपत्रक - ३१-३-२०२१ अखेरचे | २५ ते २८ |
| नफातोटा पत्रक - ०१-०४-२०२० ते ३१-३-२०२१ चे | २९ ते ३० |
| सरकारी ऑडीटर रिपोर्ट - ३१-०३-२०२१ अखेरचा | ३१ ते ३२ |
| कंकरंट ऑडीटरचा रिपोर्ट ३१-३-२०२१ अखेरचा | ३३ ते ३३ |
| अंदाजपत्रक सन २०२१-२२ चे | ३४ ते ३४ |
| रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया - डिस्क्लोजर (Discloser) | ३५ ते ३६ |
| शाखाची त्रैवार्षिक आर्थिक प्रगती | ३७ ते ३७ |
| बँकेची पंचवार्षिक आर्थिक प्रगती | ३८ ते ३८ |
| अनेक्चर | ३९ ते ३९ |
| ठेव व्याजदर | ४० ते ४० |
| कर्ज व्याजदर | ४१ ते ४२ |
| ताळेबंद नोटस ऑफ अकाऊंटस् | ४३ ते ४३ |

# दि. ३१-३-२०२१ अखेरचा ताळेबंद पत्रक

| ३१-३-२०२० रुपये पैसे | भांडवल व देणी | रुपये पैसे | ३१-३-२०२१ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| १०,००,००,०००.०० | अधिकृत भागभांडवल | | १०,००,००,०००.०० |
| | (प्रत्येकी रु. १०० चा एक भाग याप्रमाणे १० लाख भाग) | | |
| २,००,००,०००.०० | प्रेफरन्शीअल शेअर्स | | २,००,००,०००.०० |
| | (प्रत्येकी रु. १०० चा एक भाग याप्रमाणे २ लाख भाग) | | |
| ८,१०,८४,८००.०० | १) वसुल भागभांडवल | | ७,९२,४०,९००.०० |
| | (प्रत्येकी रु. १०० चा एक भाग याप्रमाणे ७९२४०९ भाग) | | |
| २,७४,०००.०० | २) वसुल प्रेफरन्शीअल शेअर्स | | ३,८०,८००.०० |
| | (प्रत्येकी रु. १०० चा एक भाग याप्रमाणे ३८०८ भाग) | | |
| ३३,८६,०३,२५३.०४ | २) राखीव व इतर निधी | | ३८,२१,७१,३२७.६४ |
| ८,०२,३८,५२५.९० | राखीव निधी | ८,७५,१२,४२६.०० | |
| ४,५५,४८,०००.०० | इमारत निधी | ५,६४,५०,०००.०० | |
| २३,१४,७५१.०० | लाभांश समाकरण निधी | २३,१४,७५१.०० | |
| ६,९१,००,०००.२२ | संशयित बुडीत निधी | ७,९१,००,०००.२२ | |
| १७,८९,९८९.५० | सभासद कल्याण निधी | १६,४५,२४५.०० | |
| ५,२१,८९७.५० | कर्मचारी कल्याण निधी | ५,११,८९७.५० | |
| ९२,५९,७२८.९२ | उत्तम जिंदगी पोटी केलेली तरतूद | ९२,५९,७२८.९२ | |
| ०.०० | गुंतवणूक चढउतार निधी | ७५,००,०००.०० | |
| १०,०२,०००.०० | गुंतवणुक घसारा निधी | ६३,३७,०००.०० | |
| ८,३०,४३,२९३.०० | पुनर्मूल्यांकन निधी | ८,२०,१५,४६३.०० | |
| १,२६,९३,०६७.०० | विशेष राखीव निधी (आय.टी.) | १,४२,१३,८१६.०० | |
| २,४०,०००.०० | निवडणूक निधी | ३,००,०००.०० | |
| ८८,५२,०००.०० | जादा राखीव निधी | १,१०,११,०००.०० | |
| २,४०,००,०००.०० | अनुत्पादक गुंतवणुक निधी (एनपीआय) | २,४०,००,०००.०० | |
| ३२८,६६,५०,६९५.८७ | ३) ठेवी | | ३५५,०३,८४,३२९.५९ |
| २७२,८९,६२,२७६.५६ | मुदत ठेव | २९६,६८,४६,५९८.२० | |
| २३७,३७,६९,३३३.५६ | अ) वैयक्तिक व इतर | २६५,४६,८५,५८०.२० | |
| ३५,५१,९२,९४३.०० | ब) सहकारी संस्था | ३१,२१,६१,०१८.०० | |
| ३८,६८,४५,४४२.६६ | सेव्हिंग्ज बँक ठेव | ४२,६६,४५,११६.१३ | |
| ३८,५९,९६,५३४.८३ | अ) वैयक्तिक | ४२,४७,०२,९५०.५० | |
| ८,४८,९०७.८३ | ब) सहकारी संस्था | १९,४२,१६५.६३ | |
| १६,९८,४८,४०९.९० | चालू ठेव | १५,६७,११,२८२.५१ | |
| १५,०१,७३,६१२.९५ | अ) वैयक्तिक व इतर | १४,१३,१६,५१९.७९ | |
| १,९६,७४,७९६.९५ | ब) सहकारी संस्था | १,५३,९४,७६२.७२ | |
| ९,९४,५६६.७५ | अल्पबचत ठेव (बिंदुसागर) | १,८१,३३२.७५ | |
| ३,७०,६६,१२,७४८.९१ | पुढील पानावर.. | | ४०१,२१,७७,३५७.२३ |



पासबुक भरण्यासाठी २४ तास पासबुक kiosk ची सुविधा

# दि. ३१-३-२०२१ अखेरचा ताळेबंद पत्रक

| ३१-३-२०२० रुपये पैसे | जिंदगी व येणी | रुपये पैसे | ३१-३-२०२१ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| **३०,३२,३७,७९५.८९** | **१) रोकड व बँक खात्यातील शिल्लक** | | **१९,११,८५,९८०.३९** |
| १२,२१,१८,९८५.२४ | अ) हातातील रोख शिल्लक | १४,१२,१८,२९९.८० | |
| १८,११,१८,८१०.६५ | ब) बँक खात्यातील शिल्लक | ४,९९,६७,६८०.५९ | |
| ०.०० | **२) अल्प मुदतीच्या ठेवी** | | ०.०० |
| **१२३,१३,२०,४३६.००** | **३) गुंतवणूक** | | **१४५,३२,१३,००८.००** |
| ५८,८१,१८,७०३.०० | अ) सरकारी रोखे | ८८,५७,३२,९३५.०० | |
| | (दर्शनी किंमत रु. ८९,९७,६०,०००/-) | | |
| | (बाजारभाव किंमत रु. ९३,००,१६,६८७/-) | | |
| १४,२५,११,०००.०० | ब) अन्य गुंतवणूक | १०,२५,११,०००.०० | |
| १,३६,०००.०० | क) जिल्हा व राज्य बँकेचे शेअर्स | १,३६,०००.०० | |
| ५०,०५,५४,७३३.०० | ड) बँकातील मुदत ठेवी | ४६,४८,३३,०७३.०० | |
| **२१०,३९,९५,७१५.८७** | **४) कर्जे** | | **२३५,५९,९३,७९०.०४** |
| **१३१,१५,१७,०५०.५५** | **I) अल्पमुदत, कॅशक्रेडिट व ओव्हरड्राफ्ट इ.कर्जे** | **१५५,८७,०३,२४१.३३** | |
| ०.०० | अ) सरकारी व इतर मान्यताप्राप्त सिक्युरिटीजच्या तारणावर | ०.०० | |
| १३०,७८,५८,५४५.१३ | ब) इतर तारणावर | १५५,७०,१७,४४२.७१ | |
| ३६,५८,५०५.४२ | क) बिगर तारणी व जामिनकीची कर्जे | १६,८५,७९८.६२ | |
| | (वरील पैकी अल्पमुदत कर्जाची थकबाकी रु. ५,६९,१७,९३४.१८/-) | | |
| **१८,३७,३०,८६४.५२** | **II) मध्यम मुदत कर्जे** | **१५,७३,३३,२०५.६२** | |
| २९,१९,८४७.७० | अ) सरकारी व इतर मान्यताप्राप्त सिक्युरिटीजच्या तारणावर | २७,७८,६०६.५० | |
| १८,०८,११,०१६.८२ | ब) इतर तारणावर | १५,४५,५४,५९९.१२ | |
| ०.०० | क) बिगर तारणी व जामिनकीची कर्जे | ०.०० | |
| | (वरील पैकी मध्यम मुदत कर्जाची थकबाकी रु. १,३८,२३,८३४.८२/-) | | |
| **६०,८७,४७,८००.८०** | **III) दीर्घ मुदत कर्जे** | **६३,९९,५७,३४३.०९** | |
| ०.०० | अ) सरकारी व इतर मान्यताप्राप्त सिक्युरिटीज्च्या तारणावर | ०.०० | |
| ६०,८७,४७,८००.८० | ब) इतर तारणावर | ६३,९९,५७,३४३.०९ | |
| ०.०० | क) बिगर तारणी व जामिनकीची कर्जे | ०.०० | |
| | (वरीलपैकी दीर्घ मुदत कर्जाची थकबाकी रु. २,३३,०९,३३०.६५/-) | | |
| | | | |
| | | | |
| **३६३,८५,५३,९४७.७६** | **पुढील पानावर..** | | **४००,०३,९२,७७८.४३** |



मोबाईलच्या गुगल प्ले स्टोअरमध्ये जाऊन संगमनेर मर्चन्टस् सर्च केल्यास बँकेचे मोबाईल ॲप डाऊनलोड करता येईल.

# दि. ३१-३-२०२१ अखेरचा ताळेबंद पत्रक

| ३१-३-२०२० रुपये पैसे | भांडवल व देणी | रुपये पैसे | ३१-३-२०२१ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ३७०,६६,१२,७४८.९१ | मागील पानावरुन... | | ४०१,२१,७७,३५७.२३ |
| ८०,८८,०००.०० | **४) बाहेरील कर्ज** | | ४,३१,१०,३१४.७६ |
| ०.०० | अ) मुदत ठेवीच्या पावती तारणावरील | ३,५०,२२,३१४.७६ | |
| ८०,८८,०००.०० | ब) लाँग टर्म (सब ऑर्डीनेटेड)डिपॉझीट ७वर्षे मुदत | ८०,८८,०००.०० | |
| २,०००.०० | **५) वसुलीसाठीची बिले (दुबेरजी)** | | ०.०० |
| २,०००.०० | अ) पाठविलेली | ०.०० | |
| ०.०० | ब) आलेली | ०.०० | |
| ०.०० | **६) शाखा समन्वय (नेटिंग)** | | ०.०० |
| ८,८६,४२,८१८.०९ | **७) थकलेल्या व्याजाबद्दल निधी (दुबेरजी)** | | ११,०३,११,५०५.५९ |
| १,३१,९३,१४३.६२ | **८) व्याज देणे** | | १,५२,६४,३२२.६२ |
| ३,४५,००,९२७.३२ | **९) इतर देणी व तरतुदी** | | ४,६४,१७,८५९.८० |
| २,८७,७७,७७५.६६ | **१०) नफा-तोटा खाते** | | ३,०२,७८,९२२.९३ |
| २,८७,६७,८२०.०३ | चालू वर्षाचा नफा-नफा तोटा खाते वरुन वर्ग | ३,०२,५१,७३५.८७ | |
| ९,९५५.६३ | मागील वर्षाचा शिल्लक नफा रु. | २७,१८७.०६ | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| ३८७,९८,१७,४१३.६० | **एकूण** | | ४२५,७५,६०,२८२.९३ |
| २८,०६,७४९.९४ | **११) हमी पोटी संभाव्य देणी** | २४,९९,८७९.१३ | |
| १०,९६,२५०.०० | अ) बँक गॅरंटी | ७,२१,१००.०० | |
| १७,१०,४९९.९४ | ब) ठेवीदार शिक्षण व जागृकता निधी (DEAF) | १७,७८,७७९.१३ | |

तपासले, बरोबर आहे. लेखा परीक्षण अहवालातील शेऱ्यास पात्र राहून (ताळेबंदपत्रक-नोटस् ऑफ अकौंट) अहवाल पान नं. ४३ वर पहा.

**मे. व्ही. एच जाजू ॲण्ड कंपनी**
चार्टर्ड अकौंटंट
(एफ.आर.एन. १०४००३ डब्लू)
सीए. विनोद जाजू पार्टनर (मे.नं. ०४२०३९)
वैधानिक लेखा परिक्षक,
नाशिक
UDIN 21042039AAAALU6256

**जितेंद्र के. लाहोटी ॲण्ड असोसिएटस्**
चार्टर्ड अकौंटंट
(एफ.आर.एन. ११८४०१ डब्लू)
सीए. जितेंद्र के. लाहोटी (मे. नं. १०४२४५)
कंकरंट ऑडिटर
संगमनेर
UDIN 21104245AAAACX6182



ॲप डाऊनलोड झाल्यानंतर मोबाईल बँकींग ॲप रजिस्टर करण्यासाठी स. १०.३० ते ५.३० दरम्यान कोणत्याही शाखेत संपर्क करा.

# दि. ३१-३-२०२१ अखेरचा ताळेबंद पत्रक

| ३१-३-२०२० रुपये पैसे | जिंदगी व येणी | रुपये पैसे | ३१-३-२०२१ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ३६३,८५,५३,९४७.७६ | मागील पानावरुन... | | ४००,०३,९२,७७८.४३ |
| ११,०५,५४,५१२.०९ | ५) व्याज येणे | | १३,२५,७०,००२.५९ |
| ८,८६,४२,८१८.०९ | अ) थकलेल्या कर्जावरील व्याज (दुबेरीज) | ११,०३,११,५०५.५९ | |
| ०.०० | ब) कर्जाचे व्याजावरील व्याज (एफआयटीएल) | ५,६२,३८७.०० | |
| २,१९,११,६९४.०० | क) गुंतवणुकीवरील व्याज | २,१६,९६,११०.०० | ०.०० |
| २,०००.०० | ६) वसुलीसाठीची बिले (दुबेरजी) | | |
| ०.०० | अ) पाठविलेली | ०.०० | |
| २,०००.०० | ब) आलेली | ०.०० | ०.०० |
| ०.०० | ७) शाखा समन्वय (नेटिंग) | | ०.०० |
| ९,०४,५२,५३८.०० | ८) इमारत व जागा | | ८,९०,९०,५६६.०० |
| २,९९,९४,२४५.०० | ९) फर्निचर व डेडस्टॉक | | २,७०,८५,२२८.०० |
| १,०२,६०,१७०.७५ | १०) इतर मालमत्ता व येणी | | ८४,२१,७०७.९१ |
| ५,५१,३७८.९२ | अ) प्रिंटींग व स्टेशनरी स्टॉक | ३,९७,८२२.३१ | |
| ९७,०८,७९१.८३ | ब) इतर | ८०,२३,८८५.६० | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| ३८७,९८,१७,४१३.६० | एकूण | | ४२५,७५,६०,२८२.९३ |
| २८,०६,७४९.९४ | ११) हमी पोटी संभाव्य येणी | २४,९९,८७९.१३ | |
| १०,९६,२५०.०० | अ) बँक गॅरंटी | ७,२१,१००.०० | |
| १७,१०,४९९.९४ | ब) ठेवीदार शिक्षण व जागृकता निधी (DEAF) | १७,७८,७७९.१३ | |

**ज्ञानेश्वर नारायण सुरम**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**संतोष करवा**
व्हा. चेअरमन

**राजेश ओं. मालपाणी**
चेअरमन

**संचालक मंडळ**

ओंकार रा. सोमाणी
राजेंद्र कारभारी वाकचौरे
राजेश मदनलाल करवा
ज्ञानेश्वर बाबुराव कर्पे

श्रीगोपाल रामनाथ पडतानी
प्रकाश सुरेश राठी
प्रकाश विश्वनाथ कलंत्री
डॉ.सौ.अर्चना आशुतोष माळी
सौ. ज्योती सचिन पलोड
तुकाराम पंढरीनाथ सांगळे (सेवक प्रतिनिधी)

दिलीपकुमार माणकचंद पारख
सतिष रामेश्वर लाहोटी
डॉ. संजय सु. मेहता
सीए. संजय शंकरलाल राठी
(तज्ज्ञ संचालक)
राहुल रामनाथ जगताप (सेवक प्रतिनिधी)

सुनिल शांताराम दिवेकर
गुरुनाथ भिकन बाप्ते
संदीप श्रीनिवास जाजू
ओंकार बद्रीनारायण बिहाणी
(तज्ज्ञ संचालक)



मोबाईल बँकिंग वापरुन विना चेक करा शाखा अंतर्गत व्यवहार व वाचवा चेक बुकवर होणारा खर्च.

# दि. १-४-२०२० ते दि. ३१-३-२०२१ चा नफा-तोटा पत्रक

| ३१-३-२०२० रुपये पैसे | खर्च | रुपये पैसे | ३१-३-२०२१ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ३१,६९,८१,४३३.४३ | १) दिलेले व्याज | . | ३३,९१,१८,५२५.९९ |
| २१,१७,९१,९७४.४३ | अ) ठेवीवरील व्याज | २२,३०,२६,०५०.२३ | |
| ४,९६,०३७.०० | ब) मुदत ठेव तारण कर्जावरील व्याज | २३,११,९३४.७६ | |
| १०,४६,९३,४२२.०० | क) प्रधान कार्यालय व शाखांना दिलेले व्याज | ११,३७,८०,५४१.०० | |
| २,८१,४१,५४७.०० | २) पगार, भत्ते, प्रा. फंड, ग्रॅच्युईटी इ. | | २,८५,२५,३४५.०० |
| २८,३८५.०० | ३) बिंदुसागर कमिशन | | ६,९६८.०० |
| ०.०० | ४) संचालक मंडळ मिटींग खर्च | | ०.०० |
| ९५,८८,३९५.३० | ५) भाडे, कर, विमा इले. खर्च | | १,०२,०१,४७४.७२ |
| ११,४६,१४७.५२ | ६) कायदे कानुन खर्च | | ९,६०,१५२.६० |
| ३,८५,०४८.८० | ७) टपाल व टेलिफोन खर्च | | ५,२९,५८२.२८ |
| ११,३९,८६८.०० | ८) ऑडीट फी | | १२,०१,२६४.०० |
| १,५९,५३,९४६.०० | ९) इन्कम टॅक्स | | १,२४,८०,४८०.०० |
| १,०८,५८,४३७.९४ | १०) मिळकतीची झीज व दुरुस्ती खर्च | | १,११,१८,१२८.६४ |
| १४,९५,४४७.३५ | ११) स्टेशनरी, छपाई, जाहिरात खर्च | | ७,५९,७२८.७३ |
| ०.०० | १२) बिगर बँकींग जिंदगीच्या विक्रीतील व | | ०.०० |
| | त्याच व्यवहारातील तोटा | | |
| ०.०० | १३) सरकारी रोख्यातून झालेला तोटा | | ०.०० |
| ५,०९,५७,११३.९३ | १४) इतर खर्च | | ५,४७,५२,५८७.०७ |
| २,४८,२७४.५८ | १) प्रवास | १,७६,९२०.०० | |
| २,७९,९९,०१७.१० | २) रिबेट | ३,२०,७८,३९८.१० | |
| ३,४५,६३४.८१ | ३) सर्वसाधारण सभा | १,९०,२९८.४८ | |
| ५६,१७,१८७.४४ | ४) इतर | ५४,५१,२२१.४९ | |
| १,६७,४७,०००.०० | ५) तरतुदी | १,६८,५५,७४९.०० | |
| | | | |
| २,८७,६७,८२०.०३ | १५) निव्वळ नफा | | ३,०२,५१,७३५.८७ |
| | | | |
| | | | |
| ४६,५४,४३,५९०.३० | एकूण | | ४८,९९,०५,९७२.९० |

तपासले, बरोबर आहे. लेखा परीक्षण अहवालातील शेऱ्यास पात्र राहून

**मे. व्ही. एच जाजू ॲण्ड कंपनी**
चार्टर्ड अकौंटंट
(एफ.आर.एन. १०४००३ डब्लू)
सीए. विनोद जाजू पार्टनर (मे.नं. ०४२०३९)
वैधानिक लेखा परिक्षक,
नाशिक
UDIN 21042039AAAALU6256

**जितेंद्र के. लाहोटी ॲण्ड असोसिएटस्**
चार्टर्ड अकौंटंट
(एफ.आर.एन. ११८४०१ डब्लू)
सीए. जितेंद्र के. लाहोटी (मे. नं. १०४२४५)
कंकरंट ऑडिटर
संगमनेर
UDIN 21104245AAAACX6182



● Account Statement घेण्यासाठी Statement Kiosk ची सुविधा

# दि. १-४-२०२० ते दि. ३१-३-२०२१ चा नफा-तोटा पत्रक

| ३१-३-२०२० रुपये पैसे | उत्पन्न | रुपये पैसे | ३१-३-२०२१ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ४४,८५,३०,०७१.५३ | १) मिळालेले व्याज | . | ४७,१०,२१,६१४.३९ |
| २६,०८,३२,११६.७३ | अ) कर्जावरील व्याज | २५,९०,४३,३६०.१८ | |
| ३,३६,६९,२१७.८३ | ब) गुंतवणुकीवरील व्याज | ३,५८,८४,०४७.५४ | |
| ४,९३,३५,३१४.९७ | क) सरकारी रोख्यातून मिळालेले व्याज | ६,२३,१३,६६५.६७ | |
| १०,४६,९३,४२२.०० | ड) प्रधान कार्यालय व शाखांकडून मिळालेले व्याज | ११,३७,८०,५४१.०० | |
| १७,६९,४१०.०० | २) सरकारी रोख्यातून मिळालेला नफा | | ४३,३५,०००.०० |
| १४,९६,७४९.०० | ३) करमुक्त उत्पन्न | | १४,३५,७४२.०० |
| ७३,४४,३८२.६२ | ४) कमिशन व ब्रोकरेज | | ७०,३०,०७८.२९ |
| ०.०० | ५) अनुदान व देणग्या | | ०.०० |
| ०.०० | ६) बिगर बँकींग जिंदगीच्या विक्रीतील व | | ०.०० |
| | त्याच व्यवहारातील उत्पन्न | | |
| ३१,९८,८२२.१५ | ७) डिव्हिडंड व इतर | | २७,०५,०४७.२२ |
| ११,४२,०३२.०० | ८) रिव्हॅल्युएशन रिझर्व्ह | | १०,२७,८३०.०० |
| ९,६६,५००.०० | ९) लॉकर भाडे | | ९,८७,४००.०० |
| ९,९५,६२३.०० | १०) सोलर वीज उत्पन्न | | १३,६३,२६१.०० |
| ४६,५४,४३,५९०.३० | एकूण | | ४८,९९,०५,९७२.९० |

**ज्ञानेश्वर नारायण सुरम**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**संतोष करवा**
व्हा. चेअरमन

**राजेश ओं. मालपाणी**
चेअरमन

**संचालक मंडळ**

ओंकार रा. सोमाणी
राजेंद्र कारभारी वाकचौरे
राजेश मदनलाल करवा
ज्ञानेश्वर बाबुराव कर्पे

श्रीगोपाल रामनाथ पडतानी
प्रकाश सुरेश राठी
प्रकाश विश्वनाथ कलंत्री
डॉ.सौ.अर्चना आशुतोष माळी
सौ. ज्योती सचिन पलोड
तुकाराम पंढरीनाथ सांगळे (सेवक प्रतिनिधी)

दिलीपकुमार माणकचंद पारख
सतिष रामेश्वर लाहोटी
डॉ. संजय सु. मेहता
सीए. संजय शंकरलाल राठी (तज्ज्ञ संचालक)
राहुल रामनाथ जगताप (सेवक प्रतिनिधी)

सुनिल शांताराम दिवेकर
गुरुनाथ भिकन बाप्ते
संदीप श्रीनिवास जाजू
ओंकार बद्रीनारायण बिहाणी (तज्ज्ञ संचालक)



● खात्यावरील शिल्लक पाहण्यासाठी Balance on Missed call सुविधा वापरा (मिस कॉल नं. ७०३५९९५९९५)

# STATUTORY AUDITOR'S REPORT

(Under Section 31 of The Banking Regulation Act 1949 and 81 (1) (a) 81 (5B) & Rule 69 of Maharashtra C operative Societies Act, 1960)

To
The Members,
The Sangamner Merchants' Co-operative Bank Ltd.
Sangamner

**Report on the Financial Statements**

